रविवार दि. १८ ऑक्टोबर २०२६ ● जालना ● वर्ष ८ वे ● अंक ४६ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता. जाफ्राबाद जि. जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता. जाफ्राबाद जि. जालना (मेन रोड)
एका छताखाली आरोग्य सेवा
डॉ. आनंद मान्ने Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com
# युवा आदर्श
संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके
https://facebook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## मावळसह इतर भागातील अतिरिक्त गवत जालन्यातील जनावरांना चारा म्हणून द्या; आ.अर्जुन खोतकर यांची मागणी

### वनमंत्री गणेश नाईक व रोजगार हमी मंत्री भरत गोगावले यांच्याशी सकारात्मक चर्चा

**जालना - प्रतिनिधी**

एका भागातील गवत वणव्यात जळून जाण्याऐवजी ते चाराटंचाई असलेल्या भागातील जनावरांच्या उपयोगी यावे आणि गवत कापणीच्या कामातून ग्रामीण मजुरांनाही रोजगार मिळावा, असा शेतकरीहिताचा प्रस्ताव आमदार अर्जुनराव खोतकर यांनी राज्य शासनासमोर मांडला आहे. मावळसह राज्यातील योग्य क्षेत्रांत उपलब्ध असलेले अतिरिक्त पशुखाद्ययोग्य गवत नियोजित पद्धतीने कापून जालना व अन्य चाराटंचाईग्रस्त भागांना पुरविण्यासाठी विशेष मोहीम राबवावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

या प्रस्तावाबाबत आमदार खोतकर यांनी वनमंत्री गणेश नाईक आणि रोजगार हमी योजना मंत्री भरत गोगावले यांच्याशी प्रत्यक्ष दूरध्वनीवरून सखोल व सविस्तर चर्चा केली. उपलब्ध गवताचा उपयोग, मजुरांना रोजगार आणि गरजू भागांपर्यंत चारा पोहोचविण्यासाठी विभागांच्या समन्वयाबाबत सकारात्मक चर्चा झाली.

यासंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, वनमंत्री गणेश नाईक, पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे आणि रोजगार हमी योजना मंत्री भरत गोगावले यांना निवेदन देण्यात आले



आहे.

“एका भागात गवत जळून जावे आणि दुसऱ्या भागात चाऱ्याअभावी शेतकऱ्यावर जनावरे विकण्याची वेळ यावी, ही परिस्थिती योग्य नियोजनातून टाळता येऊ शकते,” अशी भूमिका खोतकर यांनी निवेदनातून मांडली आहे. अधिक पाऊस पडणाऱ्या भागांत हंगामानंतर उपलब्ध होणाऱ्या गवताचे सर्वेक्षण करावे. स्थानिक पशुपालक, वन्यजीव आणि पर्यावरणाच्या गरजा भागवून उरणारे योग्य गवतच गरजू भागांना द्यावे, असे त्यांनी सुचविले आहे.

या मोहिमेत रोजगार हमी योजनेच्या नियमांत बसणाऱ्या कामांतून स्थानिक मजुरांच्या हाताला काम द्यावे. गवत कापणी, संकलन, गाठी बांधणी आणि वाहतूक यांपैकी योजनेत मान्य नसलेल्या खर्चासाठी शासनाने स्वतंत्र निधी उपलब्ध करून द्यावा. निधी व विभागीय समन्वयाअभावी तातडीचा चारा पुरवठा रखडू नये, अशी मागणीही त्यांनी केली आहे. संकलित गवताची पशुसंवर्धन विभागाकडून तपासणी करूनच पुरवठा करावा. विषारी वनस्पती, बुरशी व दूषित गवत वेगळे करून सुरक्षित साठवण करावी. गरजू पशुपालकांना ग्रामपंचायत किंवा अधिकृत केंद्रांमार्फत मोफत अथवा शासनाने निश्चित केलेल्या सवलतीच्या दरात चारा उपलब्ध करावा. त्यात अल्प व अत्यल्प भूधारक शेतकरी, भूमिहीन पशुपालक आणि तीव्र चाराटंचाई (पान २ वर)

## विद्यार्थ्यांनी शिक्षणा बरोबर समाजकार्य करायला शिकले पाहिजे - प्रा.सौ. माधुरी घार्गे - काळभोर

**मुंबई - प्रतिनिधी**

आजच्या संगणकीय, इंटरनेट आणि च्या युगात शिक्षणाबरोबर समाजसेवेला सुद्धा अनन्या साधारण महत्व आहे. त्यासाठी विद्यार्थ्यांनी आपल्या शिक्षणा बरोबर समाजाला उपयुक्य अश्या सर्वच विभागाचे ज्ञान घेणे आवश्यक आहे. म्हणून विद्यार्थ्यांनी चांगले शिक्षण घ्यावे असे मार्गदर्शन प्राध्यापिका सौ. माधुरी घार्गे-काळभोर यांनी आदर्श शिक्षण




समितीने लोअर परेल येथे नुकताच आयोजित केलेल्या ६५ व्या विद्यार्थी गुणगौरव सोहळ्यात काढले. या वेळी शांताराम गोवळकर यांना ८० वर्ष पूर्ण झाल्याबद्दल त्यांना दीर्घायुष्य लाभो अशी उपस्थितानी प्रार्थना केली. यावेळी त्यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुछ (पान २ वर)

## जालन्याच्या संभाव्य पाणीटंचाईवर पालकमंत्र्यांनी विशेष बैठक घ्यावी

### उपमहापौर राजेश राऊत यांची मागणी; आचारसंहिता संपल्यानंतर ३० ऑक्टोबरच्या आसपास बैठक घेण्याचे आश्वासन

**जालना - प्रतिनिधी**

यंदा अपेक्षेपेक्षा कमी पाऊस झाल्याच्या पार्श्वभूमीवर जालना शहरात आगामी काळात तीव्र पाणीटंचाई निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेऊन आतापासूनच ठोस उपाययोजना करण्याची मागणी उपमहापौर राजेश राऊत यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी राज्याच्या पालकमंत्री पंकजाताई मुंडे यांची भेट घेऊन शहरातील संभाव्य पाणीटंचाईवर उपाययोजना निश्चित करण्यासाठी तातडीने विशेष बैठक आयोजित करण्याची मागणी केली. या मागणीची दखल घेत आचारसंहिता संपल्यानंतर, साधारणतः ३० ऑक्टोबरच्या आसपास पाणीटंचाईच्या प्रश्नावर बैठक घेण्यात येईल, असे आश्वासन पालकमंत्री मुंडे यांनी दिल्याची माहिती आहे.

जालना शहरातील वाढती पाण्याची गरज, कमी पावसामुळे उपलब्ध जलसाठ्यांवर निर्माण होणारा संभाव्य ताण आणि उन्हाळ्यातील पाणीपुरवठ्याचे आव्हान लक्षात घेता, पाणी नियोजनाचा प्रश्न आताच प्राधान्याने हाताळण्याची गरज आहे. पाणीटंचाई निर्माण झाल्यानंतर धावपळ करण्याऐवजी उपलब्ध जलस्रोतांचे संवर्धन, पाणीपुरवठा यंत्रणेतील आवश्यक कामे आणि पर्यायी व्यवस्थांचे नियोजन वेळेत पूर्ण करावे, अशी भूमिका उपमहापौर राजेश राऊत यांनी मांडली.

जालना शहराला घाणेवाडी तलाव आणि जायकवाडी या दोन प्रमुख जलस्रोतांमधून पाणीपुरवठा केला जातो. त्यामुळे या दोन्ही स्रोतांशी संबंधित जलशुद्धीकरण केंद्रांच्या कामांना गती देणे, आवश्यक तांत्रिक कामे वेळेत पूर्ण करणे आणि उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर करण्यासाठी नियोजन करणे आवश्यक असल्याचे राऊत यांनी अधोरेखित केले. शहराची पाण्याची गरज आणि उपलब्ध जलसाठ्यांची स्थिती यांचा आढावा घेऊन पाणीपुरवठ्याचे वेळापत्रक, वितरण व्यवस्थेतील अडचणी आणि संभाव्य तुटवड्याला सामोरे जाण्यासाठी पर्यायी उपाययोजनांवर विशेष बैठकीत चर्चा होणे अपेक्षित आहे. यामुळे आगामी उन्हाळ्यात नागरिकांना अनियमित किंवा अपुऱ्या पाणीपुरवठ्याचा सामना करावा लागू नये, यासाठी प्रशासनाला पूर्वतयारी (पान २ वर)

## जायकवाडीच्या पाण्याची इंदेवाडीत चोरी? हजारो लिटर पाण्याची नासाडी; मनपा प्रशासनाच्या कारवाईवर प्रश्नचिन्ह!

**जालना - प्रतिनिधी**

शहरात यंदा कमी पर्जन्यमानामुळे आगामी काळात संभाव्य पाणीटंचाईचे संकट गडद होण्याची भीती व्यक्त केली जात असताना, शहरालगतच्या इंदेवाडी येथे जालना-जायकवाडी पाणीपुरवठा पाइपलाइनमधून अनधिकृतरीत्या पाणी घेतले जात असल्याचा आणि हजारो लिटर पाण्याची नासाडी होत असल्याचा प्रकार समोर आला आहे. या संदर्भातील व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत असून, त्यातील प्रकाराची अधिकृत पडताळणी होणे आवश्यक आहे. मात्र, या घटनेमुळे पाणीचोरी रोखण्याच्या महानगरपालिका



प्रशासनाच्या उपाययोजनांवर प्रश्न उपस्थित होऊ लागले आहेत.

एकीकडे शहरात संभाव्य पाणीटंचाई लक्षात घेऊन महानगरपालिका प्रशासनाने पाणीबचतीसाठी कडक भूमिका घेतली आहे. पाणीचोरी, अनधिकृत नळजोडण्या आणि पाण्याचा अपव्यय रोखण्यासाठी दोन विशेष भरारी पथके स्थापन करण्यात आली आहेत. वाहनांची धुलाई, गुरे-जनावरे धुणे तसेच रस्त्यावर पाणी टाकून अपव्यय करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करण्याचा इशाराही प्रशासनाने दिला आहे. अशा परिस्थितीत शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या जलवाहिनीच्या परिसरातच पाण्याचा अनधिकृत वापर होत असल्याची तक्रार समोर आल्याने प्रशासन आता काय भूमिका घेणार, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

**भरारी पथके स्थापन; मग पाणीचोरी रोखणार कशी?**

महानगरपालिका प्रशासनाने दोन दिवसांपूर्वीच संभाव्य पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर पाणीबचतीसाठी विशेष उपाययोजनांची घोषणा केली. अनधिकृत नळजोडण्या शोधणे, पाणीचोरी रोखणे, पाण्याचा अपव्यय करणाऱ्यांवर कारवाई करणे आणि मुख्य जलवाहिनी परिसरात गस्त घालणे, अशा (पान २ वर)

## युवकांमध्ये व्यसनमुक्तीचा संदेश; बारवाले महाविद्यालयात युवा संसद

**जालना - प्रतिनिधी**

युवा पिढीला व्यसनमुक्तीचे महत्त्व पटवून देणे, व्यसनांचे दुष्परिणाम समजावून सांगणे आणि निरोगी समाजाच्या निर्मितीसाठी युवकांना जागृत करणे या उद्देशाने बद्रीनारायण बारवाले महाविद्यालय, जालना येथे ‘नशामुक्त युवा’ या संकल्पनेवर आधारित तालुकास्तरीय आसपडोस युवा संसद कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. युवा कार्यक्रम व क्रीडा मंत्रालय, भारत सरकार यांच्या अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या ‘नशामुक्त युवा फॉर विकसित भारत’ या उपक्रमाचा भाग म्हणून माय भारत, जालना आणि बद्रीनारायण बारवाले



महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन जिल्हा युवा अधिकारी मयूरकुमार गोरमे, माय भारत, जालना यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. यावेळी या कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. भूषण नाफडे, जिल्हा युवा अधिकारी मयूरकुमार गोरमे, क्षयरोग विभागाचे आरोग्य निरीक्षक अमोल सांबरे, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. स्वाती पुरी, नशाबंदी मंडळ महाराष्ट्र राज्याचे जिल्हा संघटक बिस्मिल्ला सय्यद, गजानन काळे आणि वर्षा गायकवाड यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या प्रारंभी उपस्थित मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. त्यानंतर जिल्हा युवा अधिकारी मयूरकुमार गोरमे यांनी प्रास्ताविकातून कार्यक्रमाचा उद्देश स्पष्ट केला. युवकांमध्ये व्यसनमुक्तीविषयी जागरूकता निर्माण करणे, त्यांना व्यसनांपासून दूर ठेवणे आणि समाजाच्या विकासात त्यांचा सक्रिय सहभाग वाढविणे, हे अशा उपक्रमांचे प्रमुख उद्दिष्ट असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

यावेळी क्षयरोग विभागाचे आरोग्य निरीक्षक अमोल सांबरे यांनी व्यसनांमुळे मानवी शरीरावर होणारे दुष्परिणाम आणि आरोग्याच्या दृष्टीने निर्माण होणाऱ्या विविध समस्यांविषयी मार्गदर्शन केले. व्यसनांमुळे (पान २ वर)

## जालन्यात बॉम्ब शोधक व नाशक पथकाची मॉक ड्रिल; संशयास्पद बॅगमधील बॉम्बसदृश वस्तू सुरक्षितपणे निकामी करण्याची रंगीत तालीम!

### इंदेवाडी येथील भू-अनुश्रवण केंद्रात प्रात्यक्षिक; श्वान पथकासह अत्याधुनिक उपकरणांच्या मदतीने संशयास्पद बॅगची तपासणी

**जालना - प्रतिनिधी**

संभाव्य बॉम्बस्फोटाच्या धोक्याला तातडीने आणि प्रभावीपणे सामोरे जाण्यासाठी पोलिसांच्या बॉम्ब शोधक व नाशक पथकाच्या (बीडीडीएस) वतीने गुरुवार, दि. १५ ऑक्टोबर रोजी इंदेवाडी येथील भू-अनुश्रवण केंद्रात मॉक ड्रिल घेण्यात आली. या प्रात्यक्षिकादरम्यान संशयास्पद बॅग आढळल्याची माहिती मिळाल्यानंतर पथकाने घटनास्थळी धाव घेतली. श्वान पथक आणि विशेष उपकरणांच्या साहाय्याने बॅगची तपासणी करून त्यातील बॉम्बसदृश वस्तू सुरक्षितपणे हाताळण्याची प्रक्रिया पार पाडण्यात आली.



या मॉक ड्रिलच्या माध्यमातून संशयास्पद वस्तू आढळल्यास पोलिसांनी कोणती खबरदारी घ्यावी, घटनास्थळी पोहोचल्यानंतर तपासणीची प्रक्रिया कशी राबवावी आणि संभाव्य धोका लक्षात घेऊन संबंधित वस्तू सुरक्षित ठिकाणी कशी हलवावी, याचे प्रात्यक्षिक सादर करण्यात आले. मॉक ड्रिलदरम्यान नियंत्रण कक्ष, जालना येथून बीडीडीएस पथकाला संशयास्पद बॅग ठेवण्यात आल्याबाबतचा कॉल प्राप्त झाला. माहिती मिळताच पथकाने तत्काळ संबंधित ठिकाणी पोहोचून संशयास्पद बॅगच्या तपासणीसाठी आरएसपी () अंतर्गत कार्यवाही सुरू केली.

सर्वप्रथम श्वान नोरा आणि त्यांचे हँडलर अंमलदार खार्डे यांनी बॅगची तपासणी केली. यावेळी श्वान नोराने बॅगमध्ये स्फोटक पदार्थ असण्याची शक्यता दर्शविणारा इशारा दिला. त्यानंतर पथकातील कर्मचाऱ्यांनी पुढील तपासणीसाठी विशेष उपकरणांचा वापर केला. अंमलदार रोहिदास देशमाने यांनी उपकरणांच्या साहाय्याने संशयास्पद बॅगची तपासणी केली. या तपासणीत बॅगमध्ये बॉम्बसदृश वस्तू असल्याचे निदर्शनास आले. संभाव्य धोका लक्षात घेऊन पथकाने नियोजित कार्यपद्धतीनुसार पुढील प्रक्रिया राबविली.

अंमलदार सुनील निळवंत यांनी उपकरणांच्या साहाय्याने सदर बॅग सुरक्षित ठिकाणी नेली. त्यानंतर अंमलदार रोहिदास देशमाने यांनी बॅगमधील बॉम्बसदृश वस्तू बाहेर काढून मॅगझिनमध्ये ठेवली आणि वाहनाद्वारे ती एसडीए () क्षेत्रात नेण्यात आली. या संपूर्ण प्रक्रियेत संशयास्पद वस्तूची तपासणी, सुरक्षित हाताळणी आणि निर्धारित क्षेत्रात स्थलांतर करण्याच्या कार्यपद्धतीचे प्रात्यक्षिक करण्यात आले.

या मॉक ड्रिलमध्ये बीडीडीएस पथकातील जीपीएसआय पाटील, एचसी शेवाळे, पीसी पैठणे, खरात तसेच श्वान स्विटी यांनी सहकार्य केले. यावेळी भू-अनुश्रवण केंद्रातील अधिकारी व अंमलदार, तालुका जालना पोलीस ठाण्याचे एपीआय चव्हाण, आरसीपी-२ चे एचसी चरावंडे आणि इतर अंमलदार तसेच पीसी खिजर उपस्थित होते.

संशयास्पद बॅग किंवा वस्तू आढळल्यास वेळेत माहिती मिळणे, संबंधित पथकाने तातडीने घटनास्थळी पोहोचणे आणि प्रशिक्षित कर्मचाऱ्यांच्या मदतीने सुरक्षित कार्यवाही करणे महत्त्वाचे असते. अशा मॉक ड्रिलमुळे प्रत्यक्ष आपत्कालीन परिस्थितीत समन्वयाने काम करण्याचा सराव होतो. इंदेवाडी येथील या प्रात्यक्षिकातून बॉम्ब शोधक व नाशक पथकाच्या कार्यपद्धतीची रंगीत तालीम घेण्यात आली.

## शासकीय वसतिगृहासाठी स्पॉट ॲडमिशन

**जालना - प्रतिनिधी**

समाजकल्याण कार्यालयांतर्गत मुलां-मुलींचे शासकीय वसतिगृहासाठी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर शासकीय वसतिगृह जालना, भोकरदन, अंबड, बदनापुर, घनसावंगी, संत रामदास शासकीय वसतिगृह जालना, क्रांतीज्योती सावित्रीबाईफुले शासकीय वसतिगृह, जालना, अंबड, मंठा, भोकरदन या शासकीय वसतिगृहामध्ये सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षासाठी मोफत प्रवेश देण्यात येत आहेत.

त्यानुसार सन २०२६-२७ मध्ये ज्या विद्यार्थ्यांनी स्पॉट ॲडमिशनसाठी सहायकआयुक्त, समाजकल्याण कार्यालयात अर्ज केले आहेत. अशा विद्यार्थ्यांनी दि. १७ ऑक्टोबर २०२६ ते २१ ऑक्टोबर २०२६ या कालावधीमध्ये https://hmasnew.mahait.orgया संकेतस्थळावर अर्ज करावेत. या तारखेनंतर आलेले अर्ज स्वीकारले जाणार नाही.

शासकीय वसतिगृहात विनामुल्य निवास व भोजनासह शैक्षणिक साहित्य, निर्वाहभत्ता, ग्रंथालय, जिम व इंटरनेट वाय-फाय इत्यादी सुविधा विनामुल्य उपलब्ध करून देण्यात येतात. तरी गरजु विद्यार्थ्यांनी प्रवेशाबाबतचे ऑनलाईन अर्ज करण्याचे आवाहन समाजकल्याण विभागाचे सहायक आयुक्त डॉ.अनिता राठोड यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

# संपादकीय...

## जालन्यासाठी संधी; मराठवाड्यासाठी दिशादर्शक ठरू शकणारे पाऊल

आरोग्य ही केवळ वैयक्तिक गरज नाही, तर समाजाच्या विकासाचा आणि शासनाच्या लोककल्याणकारी भूमिकेचा महत्त्वाचा आधार आहे. गंभीर आजाराचे निदान झाल्यानंतर रुग्ण आणि त्याच्या कुटुंबासमोर उभे राहणारे सर्वांत मोठे आव्हान म्हणजे योग्य उपचार कुठे आणि कसे मिळवायचे, हा प्रश्न. आर्थिक परिस्थिती सामान्य असेल, तर मोठ्या शहरातील रुग्णालयांपर्यंत पोहोचणे, वारंवार प्रवास करणे, निवासाची व्यवस्था करणे आणि उपचारांचा खर्च पेलणे हे आव्हान आणखी कठीण बनते. अशा परिस्थितीत जालन्यातील महिको रिसर्च फाऊंडेशन ट्रस्टच्या नेत्रालयालगत असलेल्या तीन हेक्टर शासकीय जागेवर विविध गंभीर आजारांवरील उपचार आणि वैद्यकीय शिक्षणाच्या सुविधा सुरू करण्यास राज्य सरकारने दिलेली मंजुरी ही जालना जिल्ह्यासाठी आशादायी घडामोड आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशानुसार महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी घेतलेल्या या निर्णयाकडे केवळ एका संस्थेला मिळालेली परवानगी म्हणून पाहता कामा नये. योग्य नियोजन, दर्जेदार उपचार, परवडणारे दर आणि प्रभावी प्रशासकीय देखरेख यांच्या माध्यमातून हा निर्णय जालन्याच्या आरोग्यव्यवस्थेला नवी दिशा देण्याची क्षमता बाळगतो. कर्करोग, हृदयरोग, मेंदूविकार, रक्तविकार आणि मूत्रपिंडाच्या आजारांसारख्या गंभीर व्याधींमध्ये वेळेवर निदान आणि उपचारांना अनन्यसाधारण महत्त्व असते. अनेकदा रुग्णांना विशेष उपचारांसाठी छत्रपती संभाजीनगर, पुणे, मुंबई किंवा अन्य मोठ्या शहरांचा मार्ग धरावा लागतो. या प्रवासात वेळ आणि पैसा खर्च होतोच; शिवाय रुग्णाच्या कुटुंबाची मानसिक व शारीरिक दमछाकही होते. जालन्यात जनरल मेडिसीन, डायलिसिस, अस्थिरोग, कान-नाक-घसा, बालरोग, हृदयरोग, मेंदूविकार, रक्तविकार आणि कर्करोग उपचारांच्या सुविधा विकसित करण्याचा मार्ग मोकळा झाल्याने या परिस्थितीत सकारात्मक बदल घडविण्याची संधी निर्माण झाली आहे. विशेषतः नियमित डायलिसिसची आवश्यकता असलेल्या रुग्णांना जवळच्या ठिकाणी दर्जेदार सुविधा मिळाल्यास त्यांच्या दैनंदिन जीवनातील अडचणी कमी होऊ शकतात. त्याचप्रमाणे गंभीर आजारांचे निदान आणि उपचार स्थानिक पातळीवर उपलब्ध झाल्यास रुग्ण व त्यांच्या नातेवाइकांचा प्रवासावरील खर्च आणि वेळ वाचण्यास मदत होईल. मात्र, मंजुरी मिळणे आणि प्रत्यक्ष उपचार सुरू होणे या दोन वेगळ्या बाबी आहेत. आवश्यक यंत्रसामग्री, तज्ज्ञ डॉक्टर, प्रशिक्षित कर्मचारी, निदान सुविधा आणि उपचारांची गुणवत्ता यांची पूर्तता झाल्यानंतरच या निर्णयाचा खरा लाभ रुग्णांपर्यंत पोहोचेल. या निर्णयाचे आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे उपचार सुविधांबरोबरच वैद्यकीय आणि आरोग्यविषयक प्रशिक्षणाच्या संधी निर्माण होण्याची शक्यता. नर्सिंग, ऑप्टोमेट्री, ऑपरेशन थिएटर टेक्निशियन आणि अनेस्थेशिया असिस्टंट यांसारख्या अभ्यासक्रमांना मंजुरीच्या अटींच्या अधीन राहून सुरुवात करता येणार आहे. आरोग्यव्यवस्थेचा विस्तार केवळ इमारती आणि आधुनिक उपकरणांनी होत नाही. त्यासाठी कुशल मनुष्यबळ, प्रशिक्षित परिचारिका, तंत्रज्ञ आणि वैद्यकीय सेवांमध्ये पारंगत कर्मचारी आवश्यक असतात. स्थानिक पातळीवर प्रशिक्षणाच्या संधी उपलब्ध झाल्यास विद्यार्थ्यांना आपल्या परिसरातच कौशल्य विकसित करण्याची संधी मिळू शकते. भविष्यात आरोग्यसेवा क्षेत्रात रोजगाराच्या संधी निर्माण होण्यासही त्याचा हातभार लागू शकतो. मात्र, प्रत्येक शैक्षणिक अभ्यासक्रमाचा संस्थेत प्रत्यक्ष उपलब्ध असलेल्या वैद्यकीय सेवांशी संबंध असणे बंधनकारक आहे. ही अट केवळ औपचारिकता न ठरता प्रशिक्षणाचा दर्जा आणि विद्यार्थ्यांना मिळणारा प्रत्यक्ष अनुभव यांची खात्री देणारी ठरली पाहिजे. तीन हेक्टर शासकीय जागेवर व्यापक वैद्यकीय सुविधा विकसित करण्याची परवानगी देताना सार्वजनिक हिताचा विचार केंद्रस्थानी असणे आवश्यक आहे. या प्रकल्पाचा वापर ना-नफा तत्त्वावर करण्याची अट, औषधनिर्माणशास्त्राचा अपवाद आणि जमिनीच्या वापराबाबत घालण्यात आलेले निर्बंध यांना त्यामुळे विशेष महत्त्व प्राप्त होते. शासकीय जमीन ही सार्वजनिक संपत्ती आहे. तिचा वापर ज्या उद्देशासाठी मंजूर केला जातो, त्या उद्देशाची पूर्तता पारदर्शकपणे होणे अपेक्षित आहे. रुग्णालयीन सेवा, वैद्यकीय प्रशिक्षण आणि परवडणारी औषधे या बाबी प्रत्यक्षात किती प्रभावीपणे उपलब्ध होतात, यावर या निर्णयाचे यश अवलंबून असेल. जिल्हाधिकारी आणि विभागीय आयुक्त यांच्याकडून होणारी देखरेख ही या दृष्टीने महत्त्वाची आहे. मंजुरीच्या अटींचे पालन, जमिनीचा निर्धारित वापर आणि सार्वजनिक हिताचे संरक्षण याबाबत नियमित आढावा घेतला गेला पाहिजे. प्रशासनाने केवळ कागदपत्रांची पूर्तता तपासण्याऐवजी प्रत्यक्ष सेवा, उपचारांचा दर्जा आणि रुग्णांना मिळणारा लाभ यांवरही लक्ष केंद्रित करावे. गंभीर आजारांवरील उपचारांची उपलब्धता वाढविणे महत्त्वाचे आहेच; परंतु ते उपचार सर्वसामान्यांना परवडणे तितकेच आवश्यक आहे. अनेक कुटुंबांसाठी उपचारांचा खर्च हा आजाराइतकाच मोठा आर्थिक आघात ठरतो. औषधे, तपासण्या, शस्त्रक्रिया आणि दीर्घकालीन उपचारांचा खर्च पेलताना कुटुंबांची बचत संपते, तर काहींना कर्जाचा आधार घ्यावा लागतो. या पार्श्वभूमीवर जनऔषधी केंद्र किंवा ना-नफा तत्त्वावर औषधविक्री केंद्र सुरू करण्याची तरतूद महत्त्वाची ठरते. मात्र, अशा केंद्रांची उपलब्धता, आवश्यक औषधांचा नियमित साठा आणि रुग्णांना प्रत्यक्ष मिळणारा आर्थिक लाभ यांचीही खात्री केली पाहिजे. रुग्णालयात उपचार उपलब्ध असणे आणि ते उपचार आर्थिकदृष्ट्या परवडणे यांमध्ये मोठा फरक आहे. त्यामुळे या प्रकल्पात उपचारांचे दर, औषधांची उपलब्धता, पात्र रुग्णांना लागू असलेल्या शासकीय आरोग्य योजनांचा लाभ आणि तक्रार निवारणाची व्यवस्था यांना प्राधान्य दिले गेले पाहिजे. परवडणारे उपचार हे केवळ घोषवाक्य न राहता रुग्णांच्या अनुभवातून सिद्ध झाले पाहिजेत. महिको रिसर्च फाऊंडेशनच्या नेत्रालयामार्फत सुरू असलेल्या सेवांना बाधा न आणता अतिरिक्त वैद्यकीय सुविधा सुरू करण्यास मंजुरी देण्यात आली आहे. त्यामुळे विस्ताराच्या प्रक्रियेत विद्यमान नेत्रोपचार सेवांची गुणवत्ता, सातत्य आणि उपलब्धता कायम ठेवणे आवश्यक आहे. नवीन विभाग विकसित करताना पायाभूत सुविधांचे नियोजन, मनुष्यबळाचे व्यवस्थापन, रुग्णांच्या हालचाली, स्वच्छता आणि आवश्यक वैद्यकीय साधनांची व्यवस्था यांचा समन्वय साधावा लागेल. नवीन सुविधांचा विस्तार करताना सध्या सुरू असलेल्या सेवांवर अतिरिक्त ताण पडणार नाही, याची काळजी घेणे ही संस्थेची आणि संबंधित यंत्रणांची जबाबदारी असेल.

# नवसाला पावणारी चिंचपाड्याची नवदुर्गा...

...दुर्गा माता ही हिंदू धर्मातील एक शक्तिशाली देवी आहे, जिला आदिशक्ती मानले जाते आणि ती अजिक्य या अर्थाने ओळखली जाते. तिने दुर्गम राक्षस व इतर अनेक राक्षसांचा वध करून वाईटावर बांगत्याचा विजय मिळवता. ती पार्वती, चंडी, काली अशा अनेक रूपांमध्ये ओळखती जाते आणि नवरात्रात तिची विशेष पूजा केली जाते... अशीच काहीशी कल्याण पूर्वे तील चिंचपाड्याची नवदुर्गा म्हणून साईकृपा मित्र मंडळ गेली १९ वर्षे नवरा नवरात्रोत्सव परंपरा मोठ्या उत्साहात जपत आहे. ही संस्कृती जपताना सम राज आणि राष्ट्राता उपयुक्त ठरतील, असे अनेक बदल स्वीकारून मंडळाने एक वेगळा आदर्श देवी भक्तांना दिला आहे. सुवर्ण महोत्सवाकडे वाटचाल करणाऱ्या या मंडळाने आतापर्यंत अनेक समाजोपयोगी उपक्रम राबवले आहेत. तसेच विभागातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार लहान मुलांसाठी सांस्कृतिक कार्यक्रम चित्रकला स्पर्धा व मान्यवरांची गाठी भेटी आयोजित करण्यात आली आहेत. समाज प्रबोधन करण्याचा वसा मंडळीने घेतला आहे. कल्याण (पूर्व) चिंचपाडा विभागातील उत्कृष्ट




मंडळ म्हणून साई कृपा मित्र मंडळ उदयास येत आहे मराठी भक्ती संगीत सांप्रदायिक भजन कार्यक्रम ठेवण्यात येतो मंडळाचे संस्थापक श्री. राजेश सौर्य सांगतात मंडळाचे वैशिष्ट्य म्हणजे मंडळाचा प्रत्येक सदस्यच हा अध्यक्ष..!! मूर्तींचे देखणे रूप हेच मंडळाचे खासियत.. चिंचपाडा आजूबाजूच्या भागातील नागरिक आपले नवस बोलण्यासाठी देवीकडे साकडं घालण्यासाठी येत असतात देवी घटस्थापनेपासून ते विसर्जनापर्यंत सकाळ संध्याकाळ दैनंदिन देवीची ८ वाजता महाआरती होते.

मंडळांनी मंगळवार दिनांक २० ऑक्टोंबर २०२६ रोजी सायंकाळी ६ ते ११वाजेपर्येंत भंडारा महाप्रसाद आयोजित केला आहे तसेच देवी २१ ऑक्टोंबर रोजी सायं. विसर्जन सोहळा आयोजित केला असून विसर्जनाच्या दिवशी मंडळ लाईट डॉल्बी चा वापर न करता पारंपारिक वाद्याच्या तालावर देवींची विसर्जनाची सांगता करतात...!! या कार्यक्रमासाठी राजेश सौरे अध्यक्ष संस्थापक संस्थापक, गौतम तिवारी, किशन सिंह ( बालाजी ज्वेलर्स),तेजश भुगे,रामजी देवाशी सुभाष भोईर, हरीश म्हात्रे, संतोष शेलार(फोटोग्राफर), योगेश पाटील, मनोहर चौधरी, श्री. आनंद तिवारी, श्री. शिवाजी चौगुले,गणेश सौरे, सुधीर पांडे, हरिश्चंद्र म्हात्रे, मदन धनगर (स्वीट मार्ट) आणि संजीव सौर्य हे कार्यकर्ते मेहनत घेतात. अशी ही कल्याण पूर्वेची नवसाला पावणारी चिंचपाडाची नवदुर्गा...!! आई पर्यावरण संरक्षणासाठी सर्वांना जाणीवा दे... कष्टाने मिळते तेच टिकते हा पाठ सर्वांच्या ध्यानी असू दे पृथ्वी मातेचा संहार टाळण्यासाठी, निसर्गचक्र अबाधित राखण्यासाठी सर्व मानवांना पर्यावरणाचे, सर्व प्रकारचे प्रदूषण टाळण्याची बुद्धि दे. प्लास्टिकच्या अतिवापरावर निर्बंध आणण्याचे शहाणपण दे. आई तू सकल विश्वाची निर्माती आहेस. फक्त तुझ्या भक्तांना योग्य मार्गावर आण, तंत्रज्ञानाच्या जगात माणूस जसाजवळ येऊ दे.. सर्वांना आरोग्य चांगले दे. जय आई माता तुझ्याकडे फक्त इतकेच मागणं...!!



**शिवाजी विठ्ठल चौगुले.**
**चिंचपाडा-कल्याण(पूर्व)**
**९८६७७३२५०४**

# जे ई एस च्या रितु लोदवाल ची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड

**जालना - प्रतिनिधी**

राज्यस्तर शालेय वुशू क्रीडा स्पर्धा (१९ वर्षाखालील मुले व मुली )नंदुरबार येथे आयोजित करण्यात आल्या असून छत्रपती संभाजीनगर विभागामधून जे ई एस कनिष्ठ महाविद्यालयाची विद्यार्थिनी रितु संजय लोदवाल हिची निवड स्पर्धेसाठी झाली आहे.छत्रपती संभाजीनगर (मराठवाडा ) स्तरावरील विभागीय वुशू स्पर्धा बीड येथे जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयामार्फत नुकत्याच पार पडल्या असून मराठवाड्याचा संघ लवकरच राज्यस्तरीय स्पर्धेसाठी नंदुरबार येथे रवाना होणार



आहे.माननीय उपसंचालक,क्रीडा व युवक सेवा,छत्रपती संभाजीनगर विभाग यांच्या नियमांच्या अधीन राहून राज्यस्तरीय स्पर्धेसाठी विभागीय संघ गठीत करण्यात आला. राज्यस्तरीय वुशू क्रीडा स्पर्धेसाठी निवड झाल्याबद्दल क्रीडापटू रितु चे अभिनंदन जालना एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष पुरुषोत्तमजी बगडिया,संस्थेचे सचिव श्रीनिवासजी भक्कड, प्राचार्य डॉ.गणेश अग्निहोत्री, उपप्राचार्य डॉ.उमेश मोगले, महाविद्यालयाचे क्रीडा संचालक डॉ.हेमंत वर्मा,प्रबंधक बाबाजी सोळुंके आदींनी अभिनंदन केले तर कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य सुमंत बिक्कड,पर्यवेक्षक डी एम धनवे, डॉ.एफ एम मोहिते, डॉ.किशोर बिरकायलू, सचिन निसर्गन, क्रीडा शिक्षक प्रा.राहुल सारस्वत आदींनी मार्गदर्शन केले.

पान १ वरुन...

### मावळ सह इतर...

असलेल्या गावांना प्राधान्य द्यावे, असे निवेदनात म्हटले आहे. १५ दिवसांत गवताची उपलब्धता आणि चाऱ्याची मागणी यांचा प्राथमिक अहवाल तयार करून योग्य ठरलेल्या क्षेत्रांतून जालना व अन्य गरजू जिल्ह्यांना पहिल्या टप्प्यात पुरवठा सुरू करावा, अशी ठोस मागणी खोतकर यांनी केली आहे. कापणीपासून वितरणापर्यंत वजन, वाहतूक आणि लाभार्थ्यांच्या नोंदी ठेवून संपूर्ण व्यवहार पारदर्शक ठेवण्यावरही त्यांनी भर दिला आहे. तातडीच्या उपायांसोबत गावपातळीवर चारा लागवड, कुरण विकास आणि चारा साठे निर्माण करण्याचा दीर्घकालीन कार्यक्रम राबवावा. ''मजुरांच्या हाताला काम, जनावरांना चारा आणि संकटातील शेतकऱ्याला आधार'' देणाऱ्या या प्रस्तावावर शासनाने तातडीने निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा आमदार अर्जुन खोतकर यांनी व्यक्त केली आहे.

### विद्यार्थ्यांनी शिक्षणा...

देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला अध्यक्ष - सुरेश पवार यांनी उपस्थित सर्व पाहुण्यांचे, विद्यार्थ्यांचे व पालकाचे स्वागत केले. समितीची प्रस्थावना करताना गेल्या ६४ वर्षांच्या प्रवासाचा आढावा घेताना समितीचे तहहयात विश्वस्थ - शांताराम गोवळकर यांनी आदर्श शिक्षण समितीसाठी फार मोठे योगदान दिलेले आहे. त्यांनी या समितीच्या आर्थिक व सामाजिक भरभराटी साठी तन, मन, धन अर्पन केलेले आहे. सेक्रेटरी - भारत पाटणकर यांनी पाहुण्यांना शाल, श्रीफळ व पुष्पगुछ देऊन स्वागत केले. प्रमुख पाहुणे दत्ताराम दळवी यांनी आदर्श शिक्षण समितीच्या रूपाने लावलेल्या या झाडाला शांताराम गोवळकर यांनी आर्थिक खतपाणी घालून मोठे केले आहे. त्यानंतर शांताराम गोवळकर यांनी सांगितले की माझे सहकारी कै. शंकर पाटणकर यांचे सहकार्य मोलाचे होते. समितीच्या सर्व कार्यकर्त्यांना ह्या समितीचे पुढील कार्य व्यवस्थित चालू ठेवण्यासाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी आयकर उपायुक्त - हरीश केळकर, अधीक्षक - प्रकाश पवार, रमेश पवार हे सेवानिवृत्त झाल्याबद्दल त्यांचा स्मृतिचिन्ह, शाल, श्रीफळ व पुष्पगुछ देऊन सन्मान करण्यात आला. तर चिन्मयी पाटणकर - आर्किटेक्ट, मृण्मयी पाटणकर व चिन्मय पाटणकर हे एम. बी. ए. झाल्याबद्दल व १० वी मध्ये कु. प्रांजला वाडेकर - ९२ टक्के व साक्षी शिरकार - ७३ टक्केने पास झाल्याबद्दल स्मृतिचिन्ह, शाल, श्रीफळ व पुष्पगुछ देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी पहिली ते नववी मध्ये उत्तम गुण मिळवून पास झालेल्या विद्यार्थ्यांचा सुद्धा सन्मान करण्यात आला. तर उपस्थित पालकांना भेटवस्तू देऊन सन्मानीत करण्यात आले. संपूर्ण कार्यक्रमाचे उत्तम सूत्रसंचलन अनंत दाभोळकर यांनी केले.

### जालन्याच्या संभाव्य...

करता येईल. शहरात उपलब्ध असलेल्या पारंपरिक जलसाठ्यांकडेही गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे. जुन्या बारवा, विहिरी, बिंधन विहिरी आणि मोती तलाव यांसारख्या जलस्रोतांचे योग्य नियोजन करून त्यांचा प्रभावी वापर करण्याची आवश्यकता उपमहापौर राऊत यांनी व्यक्त केली. या जलस्रोतांची सद्यस्थिती तपासणे, त्यांची पाणी साठवण क्षमता आणि वापरयोग्यता निश्चित करणे, आवश्यक दुरुस्ती व संवर्धनाची कामे हाती घेणे आणि उपलब्ध पाण्याचा वापर कोणत्या पद्धतीने करता येईल, याचा अभ्यास करणे महत्त्वाचे ठरणार आहे. पारंपरिक जलस्रोतांचा नियोजनबद्ध वापर केल्यास मुख्य पाणीपुरवठा व्यवस्थेवरील संभाव्य ताण कमी करण्यास मदत होऊ शकते. यंदा अपेक्षेपेक्षा कमी पाऊस झाल्यामुळे आगामी उन्हाळ्यात पाणीटंचाईची तीव्रता वाढण्याची शक्यता आहे. पावसाळा संपल्यानंतर उन्हाळ्यापर्यंतचा मोठा कालावधी लक्षात घेता उपलब्ध पाण्याचे काटेकोर नियोजन करणे आवश्यक आहे. शहराची वाढती लोकसंख्या, नागरिकांची दैनंदिन पाण्याची गरज आणि पाणीपुरवठा व्यवस्थेवरील संभाव्य ताण लक्षात घेऊन प्रशासनाने दीर्घकालीन उपाययोजनांचा आराखडा तयार करावा, अशी मागणी राऊत यांनी केली. पाणीपुरवठ्यातील संभाव्य अडचणींचा आधीच आढावा घेऊन आवश्यक कामांसाठी निधी, तांत्रिक मनुष्यबळ आणि प्रशासकीय समन्वय उपलब्ध करून देण्याची गरज आहे. त्याचबरोबर पाण्याची गळती रोखणे, उपलब्ध जलसाठ्यांचे संवर्धन करणे आणि नागरिकांना नियमित पाणीपुरवठा होण्यासाठी वितरण व्यवस्थेतील त्रुटी दूर करणे यालाही प्राधान्य देणे आवश्यक आहे. पाणीटंचाईचा प्रश्न सोडविण्यासाठी केवळ महानगरपालिका स्तरावरील उपाययोजना पुरेशा ठरणार नाहीत. संबंधित विभागांमध्ये समन्वय साधून निर्णयांची अंमलबजावणी करण्यासाठी जिल्हा प्रशासन आणि इतर संबंधित यंत्रणांचा सहभाग महत्त्वाचा आहे. त्यामुळे प्रस्तावित विशेष बैठकीला भाजपचे जिल्हाध्यक्ष भास्करराव दानवे, जिल्हाधिकारी आशिमा मित्तल, महानगरपालिका आयुक्त अंजली शर्मा, पोलीस अधीक्षक तेघबीर सिंग संधू, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित राहावेत, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे. या बैठकीत उपलब्ध जलसाठ्यांचा आढावा, जलशुद्धीकरण केंद्रांशी संबंधित कामांची सद्यस्थिती, पारंपरिक जलस्रोतांचा वापर, संभाव्य पाणीटंचाईवरील पर्यायी उपाययोजना आणि आवश्यक कामांची कालमर्यादा निश्चित करण्यावर भर दिला जाणे गरजेचे आहे. पालकमंत्री पंकजाताई मुंडे यांनी आचारसंहिता संपल्यानंतर साधारण ३० ऑक्टोबरच्या आसपास विशेष बैठक घेण्याचे आश्वासन दिल्याने आता या बैठकीत कोणते ठोस निर्णय होतात, याकडे जालना शहरवासीयांचे लक्ष लागले आहे. संभाव्य पाणीटंचाईचे संकट तीव्र होण्यापूर्वी प्रशासनाने नियोजनबद्ध पावले उचलून आवश्यक कामांना गती द्यावी आणि नागरिकांना पुरेसा व नियमित पाणीपुरवठा होण्यासाठी ठोस कृती आराखडा तयार करावा, अशी मागणी उपमहापौर राजेश राऊत यांनी केली आहे. पाणीटंचाई निर्माण झाल्यानंतर उपाययोजनांची धावपळ करण्यापेक्षा संकट येण्यापूर्वीच नियोजन करणे ही काळाची गरज आहे. उपलब्ध जलस्रोतांचे संवर्धन, पाणीपुरवठा व्यवस्थेतील सुधारणा आणि विविध विभागांतील समन्वयातून जालना शहराला आगामी उन्हाळ्यात संभाव्य पाणीटंचाईपासून दिलासा देण्यासाठी प्रशासनाने आतापासूनच कार्यवाही करावी, असे राऊत यांनी नमूद केले.

### जायकवाडीच्या पाण्याची...

उपाययोजनांवर भर देण्यात आला आहे. मात्र, इंदेवाडी येथील कथित प्रकारामुळे या उपाययोजनांच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीबाबत प्रश्न निर्माण झाला आहे. भरारी पथके स्थापन केल्यानंतर संबंधित भागात तपासणी केली जात आहे का? मुख्य जलवाहिनीतून अनधिकृतरीत्या पाणी घेतले जात असल्यास ते शोधण्यासाठी कोणती यंत्रणा कार्यरत आहे? अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी नियमित पाहणी केली जाते का? या प्रश्नांची उत्तरे प्रशासनाने देण्याची गरज आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित ठिकाणी सुमारे दोन ते तीन महिन्यांपूर्वी महानगरपालिकेने नळजोडणी तोडून इशारा दिला होता. मात्र, त्यानंतरही पाइपलाइनमधून पाणी घेतले जात असल्याचे दर्शविणारा व्हिडिओ आता सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. या व्हिडिओतील ठिकाण, पाणी घेण्याची पद्धत, संबंधित जोडणीची स्थिती आणि प्रत्यक्षात पाणीचोरी होत आहे का, याची अधिकृत चौकशी होणे आवश्यक आहे. यापूर्वी कनेक्शन तोडण्यात आले असेल, तर त्यानंतर पुन्हा असा प्रकार घडला आहे का, हेही तपासावे लागणार आहे. महानगरपालिकेने यापूर्वी कारवाई केली असेल, तर त्या कारवाईचा पाठपुरावा करण्यात आला का? संबंधित ठिकाणी पुन्हा अनधिकृत जोडणी करण्यात आली आहे का? आणि असे आढळल्यास जबाबदार व्यक्तींवर कोणती कारवाई होणार? हे प्रश्न आता महत्त्वाचे ठरत आहेत. एकीकडे नागरिकांना पाणी जपण्याचे आवाहन, दुसरीकडे हजारो लिटर पाण्याच्या नासाडीचा आरोप! जालना शहरातील अनेक भागांत नागरिकांना ठरावीक वेळापत्रकानुसार पाणीपुरवठ्यावर अवलंबून राहावे लागते. घरगुती गरजा भागविण्यासाठी पाण्याचे नियोजन करावे लागते. आगामी उन्हाळ्यात संभाव्य टंचाई निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेऊन प्रशासनाने नागरिकांना पाणी जपून वापरण्याचे आवाहन केले आहे. अशा वेळी शहराच्या पाणीपुरवठ्यासाठी वापरल्या जाणाऱ्या पाइपलाइनमधून अनधिकृतरीत्या पाणी घेतले जात असल्याचे आरोप समोर येणे ही गंभीर बाब आहे. या प्रकारामुळे नेमके किती पाणी वाया गेले, त्याचा शहराच्या पाणीपुरवठ्यावर किती परिणाम झाला आणि त्यासाठी कोण जबाबदार आहे, याची वस्तुनिष्ठ तपासणी होणे आवश्यक आहे. पाणी ही सार्वजनिक संपत्ती आहे. त्यामुळे त्याचा अपव्यय रोखण्याची जबाबदारी केवळ नागरिकांची नसून संबंधित यंत्रणांचीही आहे. पाणीबचतीचे नियम सर्वांसाठी समान असतील, तर त्यांची अंमलबजावणीही कोणताही भेदभाव न करता झाली पाहिजे. पाणीबचतीच्या नियमांचा प्रश्न केवळ घरगुती वापरापुरता मर्यादित राहू नये. पाणी फिल्टर करून जारमध्ये विकणारे व्यावसायिक, वाहन धुलाई केंद्रे आणि मोठ्या प्रमाणात पाणी वापरणारे अन्य व्यवसाय यांच्याकडून पाण्याचा वापर नियमांनुसार होतो का, याचीही तपासणी करण्याची गरज आहे. सर्वसामान्य नागरिकांनी पाण्याचा अपव्यय केल्यास दंडात्मक कारवाईचा इशारा दिला जात असेल, तर व्यावसायिकांकडून अनधिकृत पाणीउपसा किंवा नियमबाह्य वापर होत असल्याचे आढळल्यास त्यांच्यावरही समान निकषांनुसार कारवाई होणार का, हा प्रश्न उपस्थित होत आहे. विशेषतः पाणीटंचाईच्या संभाव्य संकटात पाण्याचा प्रत्येक थेंब महत्त्वाचा असताना, पाण्याचा वापर करणाऱ्या सर्व घटकांची तपासणी करण्याची गरज आहे. मात्र, कोणत्याही व्यावसायिकाने नियमांचे उल्लंघन केले आहे, असा निष्कर्ष अधिकृत तपासणीशिवाय काढता येणार नाही. त्यामुळे तक्रारींची पडताळणी करून दोषींवर नियमानुसार कारवाई करणे आवश्यक आहे. इंदेवाडी येथील कथित पाणीचोरीच्या प्रकाराची महानगरपालिका प्रशासनाने तातडीने दखल घेऊन प्रत्यक्ष पाहणी करावी. संबंधित जलवाहिनीची तपासणी करून अनधिकृत जोडणी आहे का, याची खातरजमा करावी. यापूर्वी तोडण्यात आलेल्या नळजोडणीबाबतच्या कारवाईची नोंद तपासून पुन्हा अनधिकृतरीत्या पाणी घेतले जात असल्याचे सिद्ध झाल्यास संबंधितांवर नियमानुसार कठोर कारवाई करावी, अशी मागणी होत आहे. महापौर वंदनाताई मगरे, उपमहापौर राजेश राऊत आणि महानगरपालिका आयुक्त अंजली शर्मा यांनी या प्रकरणात लक्ष घालून संबंधित अधिकाऱ्यांकडून अहवाल मागवावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. त्याचबरोबर भरारी पथकांच्या कामकाजाचा आढावा घेऊन पाणीचोरी रोखण्यासाठी नियमित तपासणी आणि प्रभावी देखरेखीची व्यवस्था करणे आवश्यक आहे. संभाव्य पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर महानगरपालिका प्रशासनाने पाणीबचतीसाठी सुरू केलेल्या उपाययोजना प्रत्यक्षात किती प्रभावी ठरतात, याची कसोटी आता लागणार आहे. नागरिकांना पाणी जपून वापरण्याचे आवाहन करतानाच जलवाहिन्यांमधून होणारा अनधिकृत पाणीउपसा, पाण्याची नासाडी आणि व्यावसायिक स्तरावरील संभाव्य नियमभंग यांवरही समान गांभीर्याने कारवाई होणे आवश्यक आहे. इंदेवाडी येथील व्हिडिओची अधिकृत चौकशी करून वस्तुस्थिती स्पष्ट करणे, पाणीचोरी झाल्याचे आढळल्यास जबाबदारी निश्चित करणे आणि भविष्यात अशा प्रकारांची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी ठोस उपाययोजना करणे, ही प्रशासनासमोरील प्रमुख आव्हाने आहेत. पाणीटंचाईचे संकट येण्यापूर्वीच पाणीबचतीचे नियम लागू केले जात असतील, तर त्यांची अंमलबजावणी सर्वांसाठी समान असणार का? इंदेवाडीतील कथित प्रकारात प्रत्यक्षात काय घडले, हजारो लिटर पाण्याच्या नासाडीला कोण जबाबदार आहे आणि संबंधितांवर कारवाई होणार का? या प्रश्नांची उत्तरे आता जालना महानगरपालिका प्रशासनाला द्यावी लागणार आहेत.

### युवकांमध्ये...

व्यक्तीच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होण्याबरोबरच कुटुंब आणि समाजालाही त्याचे परिणाम भोगावे लागतात, याकडे त्यांनी लक्ष वेधले. तसेच क्षयरोगामुळे होणारे नुकसान आणि आरोग्याविषयी जागरूक राहण्याचे महत्त्व त्यांनी विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. नशाबंदी मंडळ महाराष्ट्र राज्याचे जिल्हा संघटक बिस्मिल्ला सय्यद यांनी विद्यार्थ्यांना व्यसनाधीनतेचे दुष्परिणाम, व्यसनांपासून दूर राहण्याची आवश्यकता आणि समाजात व्यसनमुक्तीचा संदेश पोहोचविण्यात युवकांची भूमिका याविषयी मार्गदर्शन केले. युवकांनी स्वतः व्यसनांपासून दूर राहून इतरांनाही त्यासाठी प्रेरित करावे, असे आवाहन या मार्गदर्शनातून करण्यात आले. कार्यक्रमादरम्यान विद्यार्थिनी पल्लवी धनगर हिने आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भगत उजेड यांनी केले, तर कांचन कायंदे यांनी उपस्थितांचे आभार मानले. शेवटी उपस्थितांनी नशामुक्तीची शपथ घेऊन व्यसनमुक्त समाजनिर्मितीसाठी प्रयत्नशील राहण्याचा संकल्प केला. शपथविधीनंतर कार्यक्रमाची सांगता झाली.

या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी प्रा. रामेश्वर म्हस्के, जयपाल राठोड, सुंदर वायाळ, संदीप गुरखा, भीमराव मोरे, दीप्ती जैन, काशिनाथ खलसे यांच्यासह इतरांनी सहकार्य केले.

# गजबजलेल्या बाजारपेठेचे अर्थकारण

दसऱ्याच्या साडेतीन मुहूर्तांपैकी एक असलेल्या शुभ दिवसापासून ते ऐन दिवाळीच्या लक्ष्मीपूजनापर्यंतचा काळ म्हणजे भारतीय बाजारपेठेसाठी जणू काही चैतन्याचे वरदानच असते. दसऱ्याला जेव्हा आपण आपट्याची पाने अर्थात सोने लुटतो, तिथूनच बाजारात एका नव्या उत्साहाची आणि खरेदीच्या महाउत्सवाची सुरुवात होते. हा काळ केवळ सणांचा आनंद साजरा करण्याचा नसतो, तर तो आपल्या देशाच्या अर्थव्यवस्थेला आणि व्यापारी जगताला एक नवी उभारी देणारा मुख्य आधारस्तंभ मानला जातो. पावसाळ्यानंतर शेतकऱ्यांच्या हाती आलेला नवा शेतीमाल आणि नोकरदार वर्गाला मिळणारा दिवाळीचा बोनस यांमुळे या काळात बाजारात पैशांचा ओघ प्रचंड वाढतो आणि मरगळलेल्या बाजारपेठेला एक नवा जिवंतपणा मिळतो.



या सणासुदीच्या कालखंडात ग्राहकांच्या खरेदी क्षमतेमध्ये आणि मानसिकतेमध्ये एक वेगळाच सकारात्मक बदल पाहायला मिळतो. दसऱ्याचे पासून सुरू झालेली गोडव्याची ही परंपरा दिवाळीच्या फराळापर्यंत अधिकच गडद होते. बाजारपेठेत या काळात मिठाईच्या दुकानांना जणू जत्रेचे स्वरूप येते. काजू कतली, मोतीचूर लाडू, पेढे आणि विविध प्रकारच्या मावा मिठाईला प्रचंड मागणी असते. यासोबतच चकली, करंजी, शेव, अनारसे, आणि लाडू अशा पारंपरिक दिवाळीच्या फराळाचे पदार्थ बाजारात मोठ्या प्रमाणावर विकले जातात. आजकालच्या धावपळीच्या युगात तयार फराळ खरेदी करण्याकडे ग्राहकांचा कल वाढला आहे, ज्यामुळे अनेक महिला गृहउद्योजकांना आणि स्थानिक बचत गटांना मोठा व्यवसाय मिळतो. मिठाई आणि फराळाची ही बाजारपेठ या काळात हजारो कोटी रुपयांची उलाढाल करते.

ग्राहक जेव्हा या भौतिक गोष्टींची खरेदी करत असतो, नेमका त्याच वेळी महाराष्ट्राच्या बाजारपेठेत वैचारिक फराळ म्हणजेच दिवाळी अंकांचे खूप मोठ्या प्रमाणावर आगमन होते. महाराष्ट्रात दिवाळी अंकांशिवाय दिवाळी नाही असे एक पक्के सांस्कृतिक आणि आर्थिक समीकरण तयार झाले आहे. दरवर्षी शेकडो नवीन आणि पारंपरिक दिवाळी अंक बाजारात येत असतात. केवळ साहित्याचा आनंद म्हणून नाही, तर व्यावसायिक दृष्टिकोनातूनही दिवाळी अंकांची खूप मोठी स्वतंत्र बाजारपेठ आणि कोट्यवधींची उलाढाल असते. या अंकांच्या छपाईसाठी लागणारा कागद, मुद्रण उद्योग लेखक-कवींचे मानधन आणि वितरकांची साखळी यांमुळे या क्षेत्रात मोठी आर्थिक गती निर्माण होते. मराठी माणसाच्या घरची दिवाळी ही या अंकांच्या खरेदीशिवाय अपूर्ण मानली जाते. आजच्या डिजिटल युगात बुकगंगा सारख्या प्लॅटफॉर्म्सवरून छापील अंकांसोबतच ई-दिवाळी अंक आणि पीडीएफ स्वरूपातील डिजिटल अंकांचीही मोठी खरेदी-विक्री होते, ज्याने या बाजारपेठेला जागतिक स्वरूप दिले आहे.

साहित्याच्या या उत्सवासोबतच घराघरांना उजळवणारा आकाशदिव्यांचा व्यवसायही तेजीत असतो. स्थानिक कारागीर रस्त्यांच्या कडेला विविध रंगीबेरंगी आकाशकंदिलांची दुकाने थाटतात. पारंपरिक कागदी कंदिलांपासून ते आधुनिक पर्यावरणपूरक कंदिलांपर्यंत शेकडो प्रकार बाजारात उपलब्ध असतात. व्होकल फॉर लोकल या मोहिमेमुळे आता चिनी कंदिलांऐवी भारतीय कारागिरांच्या हस्तकलेला ग्राहक जास्त पसंती देत आहेत.

दिवाळीत रोषणाईलाही तितकेच महत्त्व आहे. आपापल्या व्यवसायाचे ठिकाणी, घरावर मोठ्या प्रमाणावर रोषणाई केली जाते. फुलांची सजावट, पणत्यांची रोषणाईलाही महत्त्व आहे. हे सर्वच व्यवसाय तेजीत असतात.

यासोबतच सणावारात नवीन कपडे खरेदी करण्यासाठी मोठ्या ब्रँडेड शोरूम्सपासून ते स्थानिक कापड बाजारांपर्यंत सगळीकडे प्रचंड गर्दी पाहायला मिळते. कपडे व्यापारी ग्राहकांना आकर्षित करण्यासाठी विशेष फेस्टिव्हल कलेक्शन्स लाँच करतात. तसेच दिवाळीच्या रात्री आकाश उजळवून टाकणारी फटाके आणि आतिषबाजीची बाजारपेठ पूर्णपणे हंगामी असली, तरी या काही दिवसांत होणारा व्यवसाय अथांग असतो. गेल्या काही वर्षांत पर्यावरणाचे भान ठेवून ग्रीन क्रॅकर्स (हिरवे फटाके) खरेदी करण्याकडे ग्राहकांचा कल वाढला आहे.

या ग्राहकोपयोगी वस्तूंसोबतच लोक आपल्या आयुष्यभराच्या स्वप्नांची पूर्तता याच काळात करतात. भारतीय संस्कृतीत सोन्याची खरेदी करणे हे केवळ ऐश्वर्याचे प्रतीक मानले जात नाही, तर ती एक अत्यंत सुरक्षित गुंतवणूक मानली जाते. दसरा, धनत्रयोदशी आणि लक्ष्मीपूजन हे सोने खरेदीसाठी वर्षातील सर्वात शुभ मुहूर्त मानले जातात, ज्यामुळे सराफा बाजारात पाय ठेवायलाही जागा नसते. रिअल इस्टेट क्षेत्रातही याच काळात मोठी तेजी पाहायला मिळते. स्वतःचे हक्काचे घर असणे हे प्रत्येकाचे स्वप्न असते आणि या स्वप्नाची पूर्तता करण्यासाठी लोक नवीन फ्लॅटची खरेदी करण्यासाठी या शुभ कालखंडाची निवड करतात. बिल्डर्स आणि डेव्हलपर्स या काळात ग्राहकांसाठी मोफत पार्किंग, जीएसटी माफी किंवा गृहकर्जावरील व्याजाचे दर शिथिल करणे अशा अनेक आकर्षक ऑफर्स जाहीर करतात.

सध्याच्या डिजिटल युगात या सणासुदीच्या खरेदीचे स्वरूप बदलले आहे. एकीकडे स्थानिक बाजारपेठा नटलेल्या असताना, दुसरीकडे अमेझॉन इंडिया,आणि फ्लिपकार्ट, सारख्या ई-कॉमर्स प्लॅटफॉर्म्सवर दसऱ्याच्या आधीपासूनच फेस्टिव्हल सेल्स सुरू होतात. घरबसल्या मिळणारी डिलिव्हरी, क्रेडिट कार्डवरील कॅशबॅक, आणि शून्य टक्के व्याजावर कर्ज यामुळे नोकरदार वर्ग ऑनलाईन खरेदीकडे वळतो. परंतु मिठाई, फटाके, सोन्याचे दागिने, दिवाळी अंक आणि फ्लॅट खरेदी यांसारख्या गोष्टींसाठी आजही ग्राहक ऑफलाईन बाजारपेठेला आणि प्रत्यक्ष स्पर्शाच्या अनुभवालाच प्राधान्य देतो.

या सणांच्या काळाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे यामुळे देशातील तळागाळातील घटकाला रोजगार मिळतो. कॉन्फेडरेशन ऑफ ऑल इंडिया ट्रेडर्सच्या आकडेवारीनुसार, या संपूर्ण सणासुदीच्या काळात भारतीय बाजारपेठेत ५० लाखांहून अधिक तात्पुरत्या रोजगाराच्या संधी निर्माण होतात. लॉजिस्टिक, डिलिव्हरी बॉईज, पॅकेजिंग, गोदामातील मजूर आणि दुकानांमधील अतिरिक्त सेल्समन यांना काम मिळते. ग्रामीण भागातून येणारा झेंडूचा शेतकरी, मातीकाम करणारा कुंभार यांच्या खिशात पैसा गेल्यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेला मोठी संजीवनी मिळते. वित्तीय बाजारातही लक्ष्मीपूजनाच्या दिवशी संध्याकाळी शेअर बाजारात होणारे मुहूर्त ट्रेडिंग हे याचे जागतिक पातळीवरील एक अनोखे उदाहरण आहे, ज्यामध्ये गुंतवणूक करणे अत्यंत शुभ आणि समृद्धी आणणारे मानले जाते.



या सर्व आनंदात आणि चकचकाटाच्या मागे काही आव्हानेही दडलेली असतात. दसरा ते दिवाळी या काळात मागणी अचानक आणि प्रचंड वाढल्यामुळे ऐन सणाच्या तोंडावर खाद्यतेल, सुका मेवा, दूध, आणि भाजीपाल्याचे दर गगनाला भिडतात, ज्यामुळे सर्वसामान्यांचे बजेट कोलमडते. तसेच मिठाईमध्ये होणारी माव्याची भेसळ रोखणे हे प्रशासनासमोर मोठे आव्हान असते. मुख्य बाजारपेठांमध्ये होणारी वाहनांची कोंडी आणि पार्किंगच्या समस्येमुळे स्थानिक प्रशासनाची मोठी दमछाक होते.

काही आव्हाने आणि महागाईची झळ असली, तरी दसऱ्यापासून दिवाळीपर्यंतचे हे दिवस भारतीय बाजारपेठेसाठी विक्रमी कमाईचे आणि आर्थिक सुबत्तेचे सुवर्णक्षण ठरतात. मिठाईचा गोडवा, फटाक्यांची आतिषबाजी, कपडे-सोन्याची झळाळी, हक्काच्या फ्लॅटची खरेदी आणि दिवाळी अंकांचा साहित्योत्सव या सर्वांच्या माध्यमातून दरवर्षी कोट्यवधी रुपयांची उलाढाल होते. हे आर्थिक चैतन्य केवळ व्यापाऱ्यांचे खिसे भरत नाही, तर देशाच्या एकूण अर्थव्यवस्थेच्या विकासाला एक नवी ऊर्जा, गती आणि प्रगतीची दिशा देण्याचे काम करते.

**दिलीप देशपांडे.**
**जामनेर. जिल्हा जळगाव.**
**८९९९५६६९१७**

---

### सावरगाव घाट येथे २० ऑक्टोबरला दसरा मेळावा

## मुंडे समर्थकांसह समाजबांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे : प्रकाश जायभाये यांचे आवाहन

**जालना -प्रतिनिधी**

सावरगाव घाट (जि. बीड) येथील भगवान भक्तीगडावर २० ऑक्टोबर रोजी पारंपरिक दसरा मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. संत भगवान बाबा यांच्या विचारांचा वारसा आणि लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांनी जोपासलेली मेळाव्याची परंपरा यानिमित्ताने पुन्हा अनुभवायला मिळणार आहे. या मेळाव्यास राज्यभरातील समाजबांधव, वारकरी, कार्यकर्ते आणि मुंडे समर्थकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन अखिल भारतीय वंजारी युवा संघटनेचे जिल्हाध्यक्ष प्रकाश जायभाये यांनी केले आहे. संत भगवान बाबा यांची जन्मभूमी असलेल्या सावरगाव घाट येथील भगवान भक्तीगडावर दरवर्षी दसरा मेळाव्यानिमित्त भाविक आणि समाजबांधव एकत्र येतात. लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांनी या मेळाव्याला विशेष ओळख मिळवून दिली. यंदाही नेत्या पंकजाताई मुंडे यांच्या नेतृत्वाखाली ही परंपरा पुढे सुरू राहणार असल्याचे आयोजकांनी सांगितले. मेळाव्याला माजी मंत्री धनंजय मुंडे, माजी खासदार डॉ. प्रीतमताई मुंडे यांच्यासह विविध पक्षांचे आमदार, खासदार आणि मान्यवर उपस्थित राहणार असल्याची माहिती आयोजकांच्या वतीने देण्यात आली. 'वर्षभर कुठेही राहा, पण दसऱ्याला सावरगावला दिसा! दसरा मेळावा हा केवळ धार्मिक सोहळा नसून समाजबांधवांच्या एकत्रीकरणाचे आणि संत भगवान बाबांच्या विचारांचे स्मरण करण्याचे व्यासपीठ असल्याची भावना व्यक्त केली जात आहे. त्यामुळे राज्यातील विविध भागांत राहणाऱ्या समाजबांधवांनी या मेळाव्यास उपस्थित राहावे, असे आवाहन प्रकाश जायभाये यांनी केले. 'आपला दसरा, आपली परंपरा; गड ऊर्जेचा, गड आशेचा चला सावरगाव घाट! या घोषणेतून त्यांनी समाजबांधवांना मेळाव्यात सहभागी होण्याचे आवाहन केले आहे. यंदाच्या मेळाव्यासाठी भाविक आणि कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असेही त्यांनी म्हटले आहे.



---

# राज्यात भीषण दुष्काळ पण सरकारकडून पाच हजारच गाजर...?

...अख्खा खरीप हंगाम वाया गेला आहे. एल निनोमुळे संपूर्ण महाराष्ट्र दुष्काळात होरपळत आहे. शेतकऱ्यांची परिस्थिती अत्यंत वाईट आहे. त्यामुळे त्यांना खऱ्या अर्थाने तातडीने मदत देण्याची अपेक्षा आहे. बुधवारी १४ ऑक्टोबरला सरकारने राज्यातील आणखी ४० तालुके दुष्काळग्रस्त जाहीर केले आहेत. म्हणजेच याआधी २६ सप्टेंबरला २६५ आणि आता ४० असे मिळून सरकारने एकूण ३०५ तालुके दुष्काळग्रस्त जाहीर केले आहेत. याचाच अर्थ ८५ टक्के राज्य आजमितीला दुष्काळग्रस्त आहे. दुष्काळाच्या निकषाप्रमाणे सरकार शेतकऱ्यांना मदतही करेल. पण आताची स्थिती अशी आहे की, खरीप हंगामावर खर्च करूनही शेतकऱ्यांच्या हाती काही लागलेले नाही, कारण पावसाअभावी पिके करपली आहेत. शिवाय रब्बी हंगामदेखील वाया गेल्यात जमा आहे. त्यामुळे खरीप हंगामासाठी कर्ज घेतलेल्या शेतकऱ्यांची परिस्थिती खूप अवघड झाली आहे. डोक्यावर कर्ज, घरातील धान्य संपलेले असल्यामुळे शेतकऱ्याचा खिसा रिकामाच राहणार आहे. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांना सावरण्याची आणि त्यांना भक्कम आधार देण्याची जबाबदारी सरकारची आहे. सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी आहे, हे वाक्य मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री वारंवार बोलत असतात. पण, त्याची प्रचिती प्रत्यक्ष मदतीतून दिसून येत नाही, हे सरकारने लक्षात घ्यावे.

आता दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या खात्यात ५ हजार रुपये जमा करण्याची घोषणा सरकारने केली आहे. ही अग्रीम मदत असून दिवाळीपूर्वी ही रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होईल, असे सांगण्यात आले. आजपासून २० दिवसांनी दिवाळी आहे. एवढ्या कमी वेळात सरकार खरोखर दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या खात्यावर पैसे कसे जमा करेल, हा प्रश्न आहे. कारण पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेचा लाभ सर्व लाभार्थी शेतकऱ्यांना अजून मिळालेला नाही. साडेतीन महिने झाले तरी ५० टक्के शेतकऱ्यांचीही कर्जमाफी झालेली नाही.

विशेष म्हणजे दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या खात्यात म्हणताना एकूण किती शेतकऱ्यांना हे पैसे मिळतील, त्यासाठी किती रकमेची तजवीज करावी लागेल, याबाबत सरकारने काहीही स्पष्ट केलेले नाही. यंदा शेतीतून काहीही उत्पादन होणार नाही. त्यामुळे शेतकऱ्यांच्या जगण्याचा प्रश्न आहे, शिवाय हातात पैसे नसल्याने शेतकऱ्यांच्या मुलाबाळांच्या शिक्षणाचाही मोठा प्रश्न आहे. धरणात पाण्याचा जो काही साठा आहे त्याचा वापर पिण्याच्या पाण्यासाठी करायचा आहे. म्हणजे पुढील वर्षी जून-जुलैपर्यंत दुष्काळातून डोके बाहेर येण्याची काहीही शक्यता नाही. सध्या साखरेपासून धान्य, कडधान्याचे भाव प्रचंड वाढले आहेत. पिकलेच नाही तर विकणार काय, त्यामुळे धान्य-कडधान्याचे दर वाढत आहेत. म्हणूनच सरकार ५ हजार रुपयांची दिवाळीसाठी करत असलेली मदत खपच तुटपुंजी आहे. शेतकरी कुटुंब अवघ्या ५ हजार रुपयांत दिवाळीचे दिवस आनंदाने ढकलू शकेल, असे सरकारला वाटत असेल तर आपण कुठल्या जगात वावरत आहोत, याचा सरकारनेच विचार करावा. आधीच लाडकी बहीण योजनेमुळे सरकारच्या तिजोरीवर प्रचंड ताण आहे. अशातच राज्य दुष्काळाच्या खाईत सापडले आहे. त्यातच कंत्राटदारांची ९६ हजार कोटींची थकबाकी सरकार कशी देणार, याचे चित्र स्पष्ट नाही. त्यांना पैसे मिळत नसल्याने कंत्राटदार आत्महत्या करू लागले आहेत. हे कमी म्हणून की काय सरकारने जाहीर केलेल्या २ लाख रुपयांपर्यंतच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेचा अजून सर्व लाभार्थी शेतकऱ्यांना फायदा झालेला नाही. सरकारने ही योजना यंदा जुलैपासून लागू केली. आतापर्यंत २४ लाख ६७ हजार लाभार्थी शेतकऱ्यांची यादी प्रसिद्ध केली आहे. त्यातील १५ लाख ८५ हजार शेतकऱ्यांच्या खात्यात १३ हजार २७५ कोटी रुपये जमा केले आहेत. २ लाख रुपयांपेक्षा जास्त कर्ज असणाऱ्या शेतकऱ्यांना दुष्काळातही कर्जफेड करावी लागणार आहे. म्हणजेच शेतकऱ्यांची आर्थिक अवस्था दिवसेंदिवस आणखी बिघडत जाणार आहे. त्यामुळे सर्व लाभार्थी शेतकऱ्यांची कर्जमाफी होईपर्यंत पुढचा खरीप हंगाम येऊ नये, एवढेच आता सरकारला सांगावेसे वाटते. त्यातच अवघ्या ५ हजार रुपयांत शेतकऱ्यांनी दिवाळी कशी साजरी करायची, याचा विचार सरकार करणार आहे की नाही?



महागाईचा दर लक्षात घेतला तर एका ५ किंवा ६ जणांच्या शेतकरी कुटुंबाचा फराळ तरी पाच हजार रुपयांत होऊ शकतो का, याचा बजेट मांडणाऱ्या मुख्यमंत्र्यांनी अंदाज घेतला असता तर बरे झाले असते. तरीही सरकार म्हणून आपण संवेदनशील असल्याचे दाखवले जात आहे. पण भाजपचेच जालन्याचे माजी आमदार कैलास गोरंट्याल यांचे नाचगाण्यात मश्गुल असलेले व्हिडीओ व्हायरल झाल्यामुळे सत्ताधाऱ्यांना खरोखरच दुष्काळाचे गांभीर्य आहे का ? आणि असेल तर नाचगाण्यात रमणाऱ्या आणि नोटांची उधळण झेलत नाचणाऱ्या कैलास गोरंट्याल यांच्यावर भाजप कारवाई करणार का, हाच खरा प्रश्न आहे.

राज्यात भीषण दुष्काळ, त्यातच वाढणारी उष्णता आणि पाण्याचे वेगाने होणारे बाष्पीभवन यामुळे पाणीटंचाईची मोठी समस्या आ वासून उभी राहणार आहे. यंदा पहिल्या सहा महिन्यांत राज्यात बाराशेहून अधिक शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहे. तर एकट्या मराठवाडा विभागात सप्टेंबरपर्यंत ६६२ शेतकऱ्यांनी आयुष्य संपवले आहे. आता तर परिस्थिती आणखी भीषण आणि चिंताजनक आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना धीर देतानाच आपण त्यांच्या पाठीशी नाही तर सोबत आहोत, हे सरकारला दाखवून देण्याची गरज आहे. अन्यथा शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढू शकतात, ही बाब दुर्लक्षित करता येणार नाही.

**हभप शिवाजी विठ्ठल चौगुले**
**कागल-कोल्हापूर**

---

# जनतेसाठी राज्य शासनाकडून स्वतःच्या बसची दिवाळी भाडेवाढ रद्द;मात्र खाजगी

### *बस आणि बुकिंग पोर्टल्स अजूनही मोकाट!- सुराज्य अभियान*

**मुंबई - प्रतिनिधी**

दीपावलीनिमित्त एमएसआरटीसी () एस.टी. गाड्यांची १५% प्रस्तावित भाडेवाढ रद्द करण्याच्या परिवहन मंत्री श्री. प्रताप सरनाईक यांच्या निर्णयाचे सुराज्य अभियानाने स्वागत केले आहे. मात्र, खाजगी बसचालक आणि ऑनलाईन कडून होणाऱ्या २००% ते ५००% बेकायदेशीर भाडेवाढीवर तातडीने कारवाई झाली नाही, तर हा दिलासा अपुरा ठरेल, असा इशारा अभियानाने दिला आहे.



या निर्णयावर बोलतानासुराज्य अभियानाचे महाराष्ट्र राज्य समन्वयक श्री. अभिषेक मुरुकटे म्हणाले, केंद्र सरकारच्या सर्वेक्षणानुसार () ५५.८% नागरिक बसने प्रवास करतात आणि ७०.२% प्रवास हा कौटुंबिक किंवा धार्मिक कारणांसाठी असतो. सण-उत्सवाला घरी जाणाऱ्या सामान्य जनतेकडून ५ पट भाडे वसूल करणे ही सरळसरळ लूट आहे. शासन स्वतः भाडेवाढ नाकारते, मग २७ एप्रिल २०१८ च्या शासन निर्णयाचे (१.५ पट मर्यादा) उल्लंघन करणाऱ्या खाजगी बसमालक आणि ऑनलाईन पोर्टल्सवर कारवाई का नाही? मोटर वाहन कायद्याच्या कलम ८४(क) नुसार भाडेमर्यादा पाळणे ही परवान्याची पूर्वअट आहे.

आणि सारखे एग्रिगेटर्स ऑटोमेटेड अल्गोरिदमद्वारे प्रवाशांचे शोषण करत आहेत. परिवहन आयुक्तांनी कलम ९३ अन्वये ऑनलाईन एग्रिगेटर्सना परवाना सक्तीचा करून त्यांच्या ॲप्सवरडिजिटल भाडे मर्यादालागूकरावी. तसेच, आरटीओ पथकांनी केवळ दंड न आकारता कलम ८६ नुसार गाड्यांचे परवाने निलंबित करावेत. सामान्य प्रवाशांना तक्रार करणे सोपे व्हावे, यासाठी ऑनलाईन किंवा ऑफलाईन तिकीट, ॲपवरून डाऊनलोड केलेली तिकीट पीडीएफ आणिबसच्या सीट मागे आर. टी.ओ. तक्रार क्यूआर कोड ( ) छापण्याची अट परवाना मंजुरीसाठी अनिवार्य करावी,'' अशी मागणी ही श्री. मुरुकटे यांनी परिवहन मंत्री श्री. प्रताप सरनाईक यांच्याकडे केली आहे.

**सुराज्य अभियानाच्या प्रमुख मागण्या:**

१.ऑनलाईन बुकिंग ॲप्सना एग्रिगेटर परवाना सक्तीचा करून त्यांच्या सिस्टीमवर एस.टी.च्या १.५ पट भाड्याची डिजिटल मर्यादा निश्चित करावी. २.फ्लाईंग स्क्वॉडद्वारे तपासणी करून जादा भाडे जागीच परत करावे आणि नियम मोडणाऱ्यांचे परवाने निलंबित करावेत. ३.तिकिटे, ऑनलाईन ॲप्स, पीडीएफ आणि बसच्या सीटवर आरटीओचा तक्रार क्यूआर कोड छापणे ही परवाना मंजुरी व नूतनीकरणासाठी अनिवार्य अट करावी.

---

# ५ औरंगाबाद पदवीधर निवडणुकीत मत नोंदवताना पसंतीक्रम लिहिण्याची योग्य पद्धत; मतदारांसाठी महत्त्वाच्या सूचना

### मतपत्रिकेवर केवळ अंकांचा वापर करा; पहिल्या पसंतीसमोर '१' लिहिणे आवश्यक

**जालना - प्रतिनिधी**

५ औरंगाबाद पदवीधर निवडणुकीत मतदान करताना मतदारांनी मतपत्रिकेवर पसंतीक्रम नोंदविण्याची पद्धत योग्य प्रकारे समजून घेणे आवश्यक आहे. मतदान करताना कोणती काळजी घ्यावी, पसंतीक्रम कसा लिहावा आणि मतपत्रिका अवैध ठरण्याची कोणती कारणे असू शकतात, याबाबत निवडणूक प्रक्रियेसंदर्भातील सूचनांमध्ये स्पष्ट मार्गदर्शन करण्यात आले आहे.

मतदारांनी मतदान करताना केवळ मतपत्रिकेसोबत पुरविण्यात आलेल्या जांभळ्या रंगाच्या स्केच पेनचाच वापर करावा. अन्य कोणतेही पेन, पेन्सिल किंवा बॉलपेन वापरू नये. मतपत्रिकेवर पसंतीक्रम नोंदविताना निर्धारित नियमांचे पालन करणे महत्त्वाचे आहे.

**पहिल्या पसंतीच्या उमेदवारासमोर '१' लिहा**

मतदाराला ज्या उमेदवाराला सर्वाधिक पसंती द्यायची आहे, त्या उमेदवाराच्या नावासमोरील 'पसंतीक्रम' या रकान्यात '१' हा अंक लिहावा. पहिल्या पसंतीच्या उमेदवारासमोर '१' हा अंक लिहिणे आवश्यक आहे. मतपत्रिका वैध ठरण्यासाठी किमान एका उमेदवाराच्या नावासमोर पहिली पसंती नोंदविणे बंधनकारक आहे. निवडणुकीत कितीही उमेदवार उभे असले, तरी मतदाराला आपल्या पसंतीनुसार एक किंवा अधिक उमेदवारांना पसंतीक्रम देता येतो. मात्र, प्रत्येक उमेदवाराच्या नावासमोर एकच अंक लिहिणे आवश्यक आहे. एकाच उमेदवाराच्या नावासमोर एकापेक्षा अधिक अंक लिहू नयेत.

**पसंतीक्रम केवळ अंकांमध्येच नोंदवा**

मतदारांनी पसंतीक्रम नोंदविताना '१', '२', '३', '४' अशा अंकांचाच वापर करावा. एक, दोन, तीन किंवा फर्स्ट, सेकंड अशा शब्दांमध्ये पसंतीक्रम लिहू नये. तसेच आंतरराष्ट्रीय स्वरूपातील भारतीय अंक, रोमन अंक (, , ) किंवा भारतीय संविधानाच्या आठव्या अनुसूचीतील मान्यताप्राप्त भारतीय भाषांमधील अंक वापरण्याची मुभा आहे.

**एकाच पसंतीक्रमाचा पुनर्वापर टाळा**

मतदाराने एकापेक्षा अधिक उमेदवारांना पसंती द्यायची असल्यास पहिल्या पसंतीनंतर दुसऱ्या पसंतीसाठी '२', तिसऱ्या पसंतीसाठी '३' आणि त्यानंतरच्या पसंतींसाठी पुढील क्रमांक लिहावेत. प्रत्येक उमेदवारासमोर वेगळा पसंतीक्रम नोंदवावा. एकाच अंकाची पुनरावृत्ती वेगवेगळ्या उमेदवारांच्या नावासमोर करू नये. उदाहरणार्थ, पहिल्या पसंतीच्या उमेदवारासमोर '१', दुसऱ्या पसंतीच्या उमेदवारासमोर '२' आणि तिसऱ्या पसंतीच्या उमेदवारासमोर '३' असे अंक लिहिता येतील. मतदाराला सर्व उमेदवारांना पसंतीक्रम देणे आवश्यक नाही. मात्र, जेवढ्या उमेदवारांना पसंती द्यायची आहे, त्यांचा क्रम स्पष्टपणे नोंदवावा.

**मतपत्रिकेवर सही किंवा नाव लिहू नका**

मतपत्रिका वैध राहण्यासाठी त्यावर स्वाक्षरी करू नये, अंगठ्याचा ठसा उमटवू नये किंवा स्वतःचे नाव अथवा अन्य कोणताही शब्द लिहू नये. मतपत्रिकेवर कोणत्याही प्रकारचे अनावश्यक चिन्ह उमटविणेही टाळावे. पसंती दर्शविण्यासाठी 'टिक' () किंवा 'क्रॉस' () अशी खूण करू नये. अशा प्रकारची खूण असलेली मतपत्रिका अवैध ठरू शकते.

# लग्नातील दिखाऊ खर्च थांबवा आणि काम करणाऱ्यांचे पाय खेचू नका!

## *महाराष्ट्र प्रदेश माहेश्वरी सभेचे नवनिर्वाचित कोषाध्यक्ष पप्पू सेठ दाड यांची सडेतोड मुलाखत*

महाराष्ट्र माहेश्वरी समाजाचे कोषाध्यक्ष संजयकुमार उर्फ पप्पूसेठ दाड यांची सीए गोविंदप्रसाद मुंदडा यांनी विशेष मुलाखत घेतली. महाराष्ट्र माहेश्वरी सभेचे कोषाध्यक्ष म्हणून सर्वात जास्त मतांनी ते निवडून आले आहेत. ते जालना नगरपालिकेचे सभापतीही राहिले आहेत. पप्पू सेठ यांनी विचारलेल्या सर्व प्रश्नांची अतिशय समर्पक आणि दिलखुलास उत्तरे दिली. त्यांनी कोणत्याही प्रश्नाला बगल दिली नाही, सर्व प्रश्नांना थेट सामोरे गेले. तसेच समाजात काम करणाऱ्यांचे पाय खेचले जाऊ नयेत, हा अत्यंत मोलाचा संदेश आणि अपेक्षा त्यांनी समाजापुढे ठेवली आहे. सोबतच माहेश्वरी समाजातील लग्नकार्यातील दिखाऊ खर्च आणि वेगाने वाढणारे घटस्फोट यांसारख्या गंभीर विषयांवर आपली मते दिलखुलास मांडली. या व्यतिरिक्त इतरही अनेक विषयांवर त्यांनी मनमोकळेपणाने चर्चा केली.



**विशेष मुलाखत : सीए गोविंदप्रसाद मुंदडा, जालना**

प्रश्न : महाराष्ट्र माहेश्वरी सभेच्या निवडणुकीत आपल्याला सर्वात जास्त मते मिळाली, या यशाचे रहस्य काय आहे?

पप्पू सेठ* : यामध्ये आमच्या संपूर्ण टीमचा, सर्व सहकाऱ्यांचा दबदबा आणि मेहनत आहे. आमच्या पॅनलने सर्वांना सोबत घेऊन काम केले आणि त्यामुळेच सर्वांना चांगली मते मिळाली. याशिवाय माझ्या वडिलांचे पुण्यकर्म, आमच्या दाड परिवाराची प्रतिष्ठा-नाव आणि सर्व मतदारांचे आमच्यावरील प्रेम आणि आशीर्वाद... या सर्वांचाच एकत्रित परिणाम म्हणजे मला सर्वात जास्त मते मिळाली.

प्रश्न : समाजात काही लोक म्हणतात की इलेक्शन (निवडणूक) चांगली, तर काही म्हणतात सिलेक्शन (बिनविरोध निवड) चांगले. तुमचे यावर काय मत आहे?

पप्पू सेठ : नाही, इलेक्शनच (निवडणूक) चांगले आहे! सिलेक्शनमध्ये कसे असते, लोक नंतर बोलतात की ते त्यांच्या आपापसातील ओळखीचे होते, म्हणून त्यांनी पद देऊन टाकले. इलेक्शनमध्ये मात्र दूध का दूध आणि पाणी का पाणी होते. जिथे लोकशाही असते, ज्याच्या पाठीशी प्रत्यक्ष लोक असतात, तोच निवडणुकीत जोर दाखवू शकतो आणि जिंकू शकतो. काहीही काम न करणारा माणूस निवडणुकीत अजिबात लढू शकत नाही.

प्रश्न : महाराष्ट्र माहेश्वरी समाजाचे वार्षिक बजेट किती असते?

पप्पू सेठ : आमचे वार्षिक बजेट साधारण १० लाख रुपयांचे असते. एका संपूर्ण कार्यकाळात (टर्म - ३ वर्षे) जवळपास ३० लाख रुपयांपर्यंत खर्च होतो.

प्रश्न : समाजातील महिला, युवक आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी तुमच्याकडे काय नियोजन (प्लॅन) आहे?

पप्पू सेठ : समाजातील महिला, युवक आणि ज्येष्ठ नागरिक... आपण सर्वांनी मिळून एकत्र काम केले पाहिजे. मागील एक-दोन कार्यकाळात हे काम एकत्र झाले नव्हते. परंतु, या वेळी आम्ही सर्वांनी मिळूनमिसळून काम करण्याचे ठरवले आहे आणि या तिन्ही घटकांचे काम होणार आहे. युवक आणि महिलांशिवाय ज्येष्ठांचे काम पूर्णत्वास जाऊ शकत नाही. मध्यंतरी काही पद्धती बदलल्या गेल्या होत्या, पण आता आमचे तसे काही होणार नाही. सर्वांना सोबत घेऊनच मोठमोठे कार्यक्रम राबवले जातील. त्यांच्या विचारांनुसार आम्ही चालू आणि आमच्या विचारांनुसार ते चालतील. सर्वांचे एकाच सुरात आणि एकत्र चालले, तरच महाराष्ट्रातील कामाचा प्रभाव दिसेल. जर आपण वेगवेगळे भांडत राहिलो, तर कोणताही कार्यक्रम करण्यात किंवा काम करण्यात काहीही अर्थ उरणार नाही.

प्रश्न : लग्नकार्यातील वाढत्या वायफळ खर्चाबद्दल (फिजूल खर्चाबद्दल) आपण काय सांगू इच्छिता?

पप्पू सेठ : लग्नकार्यातील वायफळ खर्च तर आज माणूस सहनच करू शकत नाही, अशी स्थिती आहे. आजकाल शिकलेली मुले-मुली आहेत, त्यांचे विचार वेगवेगळे असतात आणि त्यामुळे आज समाजाची परिस्थिती अत्यंत नाजूक झाली आहे. घटस्फोटांचे प्रमाण प्रचंड वाढले आहे, लग्न मोडण्याचे प्रमाण वाढले आहे आणि साखरपुडे/सोयरीक मोडण्याचे प्रमाणही वाढले आहे. जोपर्यंत या मानसिकतेत खरी सुधारणा होत नाही, तोपर्यंत दिखाऊ वायफळ खर्च करून काहीही फायदा होणार नाही. आधी लग्न साधेपणाने करा आणि त्या जोडप्याला स्थिरस्थावर होऊ द्या. वर्ष-दोन वर्षे त्यांचे एकमेकांशी कसे जुळते, संसार कसा चालतो हे पाहावे, त्यानंतर पुढच्या गोष्टी कराव्यात. काही लोक तर आता असेही बोलत आहेत की, आम्ही लग्नाचे रिसेप्शन (स्वागत समारंभ) दोन वर्षांनंतर करू, अशाही चर्चा आता समाजात सुरू झाल्या आहेत. ते प्रत्यक्षात घडत नसले तरी लग्न चांगल्या प्रकारे केले जाऊ शकते. जर जोडी चांगली जमली तर ठीक, नाहीतर आजकाल हे नाते टिकवणे खूप त्रासाचे आणि कठीण काम झाले आहे.

प्रश्न : समाजात घटस्फोट ही एक मोठी चिंतेची बाब बनली आहे, यासाठी आपण काय पावले उचलणार आहात?

पप्पू सेठ : आम्ही आता महाराष्ट्र प्रदेश सभेच्या माध्यमातून यावर एक विशेष समिती निश्चित करत आहोत. विवाह संबंध जोडणे आणि घटस्फोट या दोन्ही बाबतीत आम्ही महाराष्ट्रातील पाच प्रमुख पंचांची एक नवीन कमिटी तयार करत आहोत. या कमिटीला पूर्वसूचना दिल्याशिवाय परस्पर कोणताही निर्णय घेतला जाणार नाही. लग्नाच्या बाबी असोत किंवा घटस्फोटाची प्रकरणे, समाजातील ही समस्या सोडवण्याचा आमचा हा प्रयत्न आहे. या पुढील तीन वर्षांच्या काळात आम्ही हा उपक्रम राबवून पाहणार आहोत. या समितीसाठी आम्ही युवा सहयोगाचे ज्येष्ठ नेते जे महाराष्ट्रातील आहेत, त्या श्रीकांतजी लखोटिया यांना सोबत घेतले आहे. ते सध्या आमच्या प्रदेशचे उपाध्यक्ष आहेत. या विषयावर त्यांचा दांडगा अनुभव आहे आणि त्यांचे योगदानही खूप मोठे आहे. त्यांनी मागील तीन वर्षांपासून आपले स्वतःचे कामधंदे बाजूला ठेवून स्वतःला याच सामाजिक कार्यात झोकून दिले आहे. त्यामुळे त्यांच्या अनुभवाचा समाजाला खूप मोठा फायदा होईल.

प्रश्न : समाजातील काही असामाजिक घटकांबद्दल आपण काय सांगू इच्छिता?

पप्पू सेठ : समाजातील असामाजिक घटक म्हणजे... ज्या जुनाट रूढी आणि नियम आहेत, त्यामध्ये बदल करण्याची प्रक्रिया नेहमी चालत आली आहे. परंतु, कोणताही बदल एकदम घडून येत नाही. हळूहळू हे बदल करावेच लागतील आणि ते येत्या ५ ते १० वर्षांत १०० टक्के घडून येतील.

प्रश्न : माहेश्वरी सभेचे देशपातळीवर काय योगदान आहे?

पप्पू सेठ : माहेश्वरी सभा ही आज देशातील सर्वात मोठी एक अग्रगण्य संस्था आहे. या सभेच्या योगदानातून आज हजारो मुले-मुली आयपीएस, आयएएस यांसारख्या स्पर्धा परीक्षांची तयारी करत आहेत, अनेक जण यशस्वी इंजिनिअर म्हणून उभे राहिले आहेत. ज्यांच्या राहण्याची व्यवस्था नसते, त्यांच्या राहण्याची (वसतिगृहाची) सोय संस्थेकडून केली जाते. ज्यांच्याकडे शिक्षणाची फी भरायला पैसे नसतात, त्यांच्या फीची व्यवस्था केली जाते. ज्यांचा व्यवसाय आर्थिक अडचणीत आला असेल, त्यांना बिर्ला (आदित्य बिर्ला) समूहाच्या सहकार्याने व्यवसाय पुन्हा उभा करून दिला जातो. याशिवाय समाधानाचा भाग म्हणजे आपल्या समाजातील विधवा महिलांना आम्ही दरमहा ५०० रुपये पेन्शन/मदत देतो. अशा प्रकारे सर्व बाजूंनी समाजाचे योगदान असल्याने लोकांना एक मोठा आधार मिळत आहे. हे काम जरी हळूहळू चालत असलेतरी ते एकाच वेळी मोठ्या प्रमाणावर विस्तारत आहे.

प्रश्न : शेवटचा प्रश्न, पप्पू सेठजी, आपण समाजाला काय संदेश द्याल?

पप्पू सेठ : मी तर हाच संदेश देईन की समाजात सर्वांनी आनंदाने आणि सुखाने राहावे. सर्वांनी एकमेकांशी मिळूनमिसळून राहावे, समाजात आपापसात कसलाही द्वेष नसावा. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे जेव्हा द्वेष नसतो, तेव्हा काम अधिक जोमाने आणि यशस्वीरीत्या पूर्ण होते आणि मुख्य म्हणजे, चांगल्या भावनेने काम करणाऱ्या लोकांचे पाय खेचू नका (टांग खेचू नका)! एवढाच माझा कळकळीचा संदेश आहे. जो माणूस प्रामाणिकपणे आणि उत्कृष्ट काम करतो, त्याच्या पाठीशी संपूर्ण समाजाने ठामपणे उभे राहावे, हाच माझा सर्वात मोठा संदेश आहे.

# जिल्हा परिषदेच्या शाळेत 'ओळख भारतीय संविधानाची' हा नाविन्यपूर्ण उपक्रम

**मंठा - प्रतिनिधी**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, पाटोदा येथे 'आनंददायी शनिवार' या उपक्रमांतर्गत १७ ऑक्टोबर, २०२६ रोजी इयत्ता तिसरीच्या विद्यार्थ्यांसाठी 'ओळख भारतीय संविधानाची' हा विशेष शैक्षणिक उपक्रम प्रयोगशील शिक्षक गंगाधर वानोळे यांनी राबविला.



या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना भारतीय संविधानाची निर्मिती, त्याचे स्वरूप व कार्य, मूलभूत हक्क, मूलभूत कर्तव्ये, राज्याच्या धोरणाची मार्गदर्शक तत्त्वे, तसेच राष्ट्रपती व राज्यपाल यांच्याशी संबंधित महत्त्वाच्या घटनात्मक तरतुदींची माहिती सोप्या व समजण्यासारख्या भाषेत देण्यात आली. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये संविधानाविषयी जिज्ञासा, आत्मविश्वास आणि लोकशाही मूल्यांची प्राथमिक जाणीव निर्माण होण्यास मदत झाली. लहान वयातच विद्यार्थ्यांना भारतीय संविधानाची ओळख करून देणे, त्यांना आपल्या हक्कांची व कर्तव्यांची जाणीव करून देणे आणि न्याय, स्वातंत्र्य, समता व बंधुता या घटनात्मक मूल्यांची रुजवण करणे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता.

गटशिक्षणाधिकारी डी. एन. क्षीरसागर, शिक्षण विस्तार अधिकारी के.जी.भाऊ राठोड, विषय साधन व्यक्ती संतोष गिऱ्हे, केंद्रप्रमुख महेशकुमार चौधरी आणि मुख्याध्यापक संतोष तोटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच पालक व शाळा व्यवस्थापन समितीच्या तसेच सहकारी शिक्षकांच्या सहकार्याने शाळेत विविध नाविन्यपूर्ण शैक्षणिक उपक्रम राबविण्यात येत आहेत.

# श्रीष्टी तांडा येथे भव्य मोफत नेत्र व त्वचारोग तपासणी शिबिर उत्साहात संपन्न!

**परतूर - प्रतिनिधी**

ग्रामीण भागातील नागरिकांना दर्जेदार आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्यासोबतच गरजू आणि निराधार व्यक्तींना शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्याच्या उद्देशाने श्रीष्टी तांडा येथे आयोजित भव्य मोफत नेत्र तपासणी व त्वचारोग तपासणी शिबिर शुक्रवार, दि. १६ ऑक्टोबर २०२६ रोजी उत्साहात पार पडले. मुख्यमंत्री सहायता निधी कक्ष, जालना व गणपती नेत्रालय हॉस्पिटल, जालना यांच्या संयुक्त विद्यमाने हनुमान मंदिर सभागृहात या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. नायक प्रतिष्ठाण व ग्रामपंचायत कार्यालय, श्रीष्टी तांडा यांच्या पुढाकारातून राबविण्यात आलेल्या या सामाजिक उपक्रमाला तांडा व परिसरातील नागरिकांनी प्रतिसाद दिला. नेत्र तपासणीसह त्वचारोग तज्ज्ञांकडून आरोग्य तपासणी शिबिरामध्ये नागरिकांची मोफत नेत्र तपासणी




करण्यात आली. डोळ्यांच्या विविध तक्रारी असलेल्या नागरिकांना तपासणीची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली. तसेच त्वचारोग तज्ज्ञांकडून त्वचेशी संबंधित आजारांची तपासणी करण्यात आली आणि रुग्णांना आवश्यक वैद्यकीय मार्गदर्शन देण्यात आले. ग्रामीण भागातील अनेक नागरिकांना नियमित आरोग्य तपासणीसाठी शहरात जावे लागते. प्रवासाचा खर्च, वेळ आणि आर्थिक अडचणींमुळे काही नागरिक तपासणी पुढे ढकलतात. अशा नागरिकांना गावातच मोफत तपासणीची सुविधा उपलब्ध करून देणे हा या उपक्रमाचा महत्त्वपूर्ण उद्देश होता. विशेषतः महिला, ज्येष्ठ नागरिक आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना या शिबिरामुळे आरोग्य तपासणीची संधी मिळाली. निराधार, ज्येष्ठ नागरिक व दिव्यांग लाभार्थ्यांसाठी विशेष उपक्रम आरोग्य तपासणीसोबतच शिबिराच्या ठिकाणी विविध शासकीय पेन्शन योजनांच्या पात्र लाभार्थ्यांची कागदपत्रे स्वीकारून अर्जाच्या फाईल तयार करण्याची प्रक्रिया राबविण्यात आली. यामध्ये प्रामुख्याने पुढील योजनांचा समावेश होता. श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तिवेतन योजना - संजय गांधी निराधार अनुदान योजना - इंदिरा गांधी राष्ट्रीय दिव्यांग निवृत्तिवेतन योजना या योजनांसाठी पात्र असलेल्या नागरिकांना आवश्यक कागदपत्रे सादर करण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. लाभार्थ्यांच्या अर्जांची फाईल तयार करण्यासाठी कागदपत्रे संकलित करण्यात आली. त्यामुळे शासकीय पेन्शन योजनांचा लाभ मिळविण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या निराधार व्यक्ती, ज्येष्ठ नागरिक आणि दिव्यांग लाभार्थ्यांना मदत झाली.

# पाथ्रीकर कॅम्पसमध्ये 'जलसा रास दांडिया'चा जल्लोष; 'डिजिटल रील' स्पर्धेतील विजेत्यांचा सन्मान

**बदनापूर - प्रतिनिधी**

निर्मल क्रीडा व समाज प्रबोधन ट्रस्टच्या वतीने बदनापूर येथील पाथ्रीकर कॅम्पसमध्ये आयोजित 'जलसा रास दांडिया २०२६' हा महोत्सव अत्यंत उत्साही आणि सांस्कृतिक वातावरणात संपन्न झाला. नवरात्रोत्सवाचे औचित्य साधून आयोजित या कार्यक्रमात शेकडो विद्यार्थ्यांनी दांडिया व गरब्याचा मनमुराद आनंद लुटला. निर्मल क्रीडा व समाज प्रबोधन ट्रस्टचे अध्यक्ष डॉ. देवेश पाथ्रीकर यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या महोत्सवाचे मुख्य आकर्षण ठरलेल्या डिजिटल रील स्पर्धेतील विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते रोख पारितोषिके देऊन गौरविण्यात आले. विद्यार्थ्यांमधील सुप्त कलागुणांना, कल्पकतेला आणि त्यांच्या डिजिटल माध्यमांतील कौशल्यांना वाव देण्याच्या उद्देशाने या विशेष रील स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेत विद्यार्थ्यांनी जलसा रास दांडिया २०२६ या संकल्पनेवर आधारित एकापेक्षा एक नावीन्यपूर्ण आणि आकर्षक रील्स तयार केल्या होत्या. यामध्ये तरुणाईचा जल्लोष आणि



आपली समृद्ध सांस्कृतिक परंपरा याचे सुरेख प्रतिबिंब उमटले. पाथ्रीकर कॅम्पसच्या विशाल क्रीडांगणावर सायंकाळी ६ ते मध्यरात्री १२ वाजेपर्यंत संगीत आणि दांडियाच्या तालावर संपूर्ण परिसर मंत्रमुग्ध झाला होता. या सोहळ्याला संस्थेचे संस्थापक डॉ. दत्ताभाऊ पाथ्रीकर, सचिव डॉ. एम. डी.पाथ्रीकर, अध्यक्ष डॉ. देवेश पाथ्रीकर, ट्रस्टी डॉ. एस. एस. शेख, डॉ.खान नाजमा, डॉ. सोनाली अग्रवाल, डॉ. प्रज्ञा सानप आणि इंजि. सोहा शेख यांची प्रमुख उपस्थिती होती. मान्यवरांच्या हस्ते विजेत्या विद्यार्थ्यांना सन्मानित करण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना आपले कलागुण सादर करण्यासाठी एक मोठे व्यासपीठ उपलब्ध झाले असून, त्यांच्यात सांघिक भावना आणि सांस्कृतिक जाणीव वृद्धिंगत होण्यास मदत होईल, असा विश्वास यावेळी मान्यवरांनी व्यक्त केला.कार्यक्रमाचे नेटके सूत्रसंचालन डॉ. शेख एस. एफ. यांनी केले, तर उपस्थितांचे आभार मुख्याध्यापिका निशिगंधा देशमुख यांनी मानले. हा महोत्सव यशस्वी करण्यासाठी पाथ्रीकर कॅम्पसमधील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी प्रतिनिधींनी परिश्रम घेतले. या स्पर्धेतील प्रथम क्रमांकाच्या विजेत्याला दोन हजार रुपये, द्वितीय क्रमांकाच्या विजेत्याला पंधराशे रुपये, तर तृतीय क्रमांकाच्या विजेत्याला एक हजार रुपये असे पारितोषिक देण्यात आले. संस्थेचे संस्थापक डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर, सचिव डॉ. एम. डी. पाथ्रीकर, ट्रस्टी डॉ. एस. एस. शेख, डॉ. खान नाजमा, डॉ. सोनाली अग्रवाल, डॉ. प्रज्ञा सानप आणि इंजि. सोहा शेख यांच्या हस्ते विजेत्यांना पारितोषिकांचे वितरण करण्यात आले. महोत्सवात शिस्त आणि सर्वोत्तम सादरीकरणाचे परीक्षण करण्यासाठी डॉ. परवीन अन्सारी, डॉ. अस्मिता खैरे, डॉ. जीवनज्योती निकाळजे, डॉ. जायभाये, अलका भोईटे, दीपाली खैरे, बहुरे उज्वला, शीतल तारो आणि डॉ. शेळके यांनी गरबा निरीक्षक म्हणून.

# शिक्षक, पालकांनी मुलांचा कल लक्षात घ्यावा- प्रा. रंगनाथ खेडेकर

**परतूर - प्रतिनिधी**

पालक व शिक्षकांनी विद्यार्थ्यांचा कल नेमका कुठे आहे हे लक्षात घेऊन पुढील पावले उचलावीत तसेच सकारात्मक व वैज्ञानिक दृष्टिकोन समोर ठेवून वाटचाल करावी असे प्रतिपादन प्रा. रंगनाथ खेडेकर यांनी केले. शहरातील छत्रपती शिवाजीनगरमधील लालबहादूर शास्त्री विद्यालयात शनिवारी (दि. १७) मुख्याध्यापक एल. के. बिरादार यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित पालक मेळाव्यात प्रमुख मार्गदर्शक म्हणून ते बोलत होते.उपमुख्याध्यापक राजकुमार राऊत हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते.तर प्रमुख पाहुणे म्हणून पर्यवेक्षक शिवाजी आळणे उपस्थित होते.

खेडेकर पुढे म्हणाले की,शिक्षक, पालक व विद्यार्थी हा प्रगतीचा त्रिवेणी संगम आहे.या तीनही घटकामध्ये समन्वय राहण्यासाठी पालक मेळावे घेतले जातात. अशा प्रकारच्या मेळाव्यामधून विचारांची देवाणघेवाण होते. पालकांना आपल्या मुलांची खरी प्रगती लक्षात येते. झालेल्या चुका सुधारण्याची संधी मिळते.पालकांनी मुलांकडे पुरेसे लक्ष द्यावे. मुलांनी पालकांच्या परिश्रमांची जाणीव ठेवत नियमित अभ्यास करावा. चांगल्या गोष्टी सांगाव्या लागतात. वाईट गोष्टी आपोआप येतात. मोबाईल हा ज्ञानाचा अथांग सागर आहे. परंतु यातून काय घ्यायचे आणि काय नाही हे ठरवणे अतिशय महत्वाचे आहे.असेही खेडेकर शेवटी म्हणाले.

यावेळी शिक्षक अरुण वावरे,के. एस. वाकोडे यांनी मनोगत व्यक्त केले. उपमुख्याध्यापक राऊत यांनी अध्यक्षीय समारोप केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक बालाजी ढोबळे यांनी केले.सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन श्रीमती सविता अवसरमोल यांनी केले.पसायदानाने मेळाव्याची सांगता झाली. मेळाव्याला पालक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मुलांचा कल नेमका कुठले शिक्षण घेण्यासाठी आहे ? खेळाकडे आहे की एखाद्या विशिष्ट अभ्यासक्रमाकडे हे तपासण्यासाठी कल चाचणी देखील घेतली जाते. यामुळे विद्यार्थ्यांना आपल्या आवडीचे क्षेत्र निवडून करिअर घडविणे आणखी सुलभ होते.

आमच्या विद्यालयात विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी विविध प्रकारचे उपक्रम सातत्याने राबवले जातात.क्रीडा व सांस्कृतिक तसेच स्पर्धा परीक्षेत विद्यालयाचा नावलौकिक आहे.विद्यार्थ्यांच्या तसेच पालकांच्या समस्या लक्षात घेऊन योग्य मार्ग काढला जातो. विद्यार्थ्यांकडे वैयक्तिक लक्ष दिले जाते. याचा परिणाम म्हणजे आज आमच्या विद्यालयाचे अनेक विद्यार्थी शैक्षणिक,सामाजिक, वैद्यकीय, विधी, कला, कृषी, राजकीय या व इतरही अनेक क्षेत्रात चांगले काम करत आहेत.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६**, E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.